पाक्षिक


प्रदेश बीजेपी

# मनोगत



**शूर मराठा सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार मिळवण्यात राज्य सरकारला यश**

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 9 ● 1 मे 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# धडा शिकवणारच

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी



## अध्यक्षीय मनोगत

# मोदीजींच्या नेतृत्वात राष्ट्राचा निर्धार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहलगाम येथे दहशतवादी हल्ला करणाऱ्या प्रत्येक दहशतवाद्याला आणि त्यांना बळ देणाऱ्यांना शोधून शिक्षा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पहलगामच्या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात संताप आहे. भारतात प्रत्यक्ष दहशतवादी हल्ला करणारे आणि असे हल्ले घडविणारे, अशा दोघांनाही जबरदस्त धडा शिकवा, अशी जनतेची भावना आहे. हल्ल्याचा निषेध करण्यासाठी लोक काश्मीर, दिल्ली, महाराष्ट्र असे सर्वत्र रस्त्यावर उतरले. जात, धर्म, पंथ विसरून सर्वांनी एकजुटीचे दर्शन घडविले. दहशतवाद्यांनी कल्पना केली नसेल अशी शिक्षा त्यांना मोदीजी देतील, याची जनतेला खात्री आहे. मोदीजींनी याबाबत लष्कराला पूर्ण मोकळिक दिली आहे. कारवाईसाठी राजधानीत नियोजन सुरू आहे. लष्कर आपल्या योजनेनुसार कारवाई करेल. अशा प्रसंगात जनतेची एकजूट, ही देशाची सर्वात मोठी ताकद असते. आतापर्यंत नागरिकांनी एकजूट दाखविली आहे. पण काँग्रेस पक्षाच्या काही नेत्यांनी असंवेदनशील वक्तव्ये करून हल्ल्यात बळी पडलेल्यांच्या कुटुंबियांच्या भावना दुखावल्या. मी अशा वक्तव्यांचा निषेध करतो. देश एका ऐतिहासिक कारवाईच्या प्रक्रियेत आहे. मोदीजींच्या नेतृत्वात देशाचा दृढनिर्धार आहे. आपली एकजूट व आपला निर्धार कायम ठेऊ या. मोदी सरकारने पाकिस्तानबरोबरचा सिंधू जल करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. १९६० मध्ये झालेला हा करार भारताच्या दृष्टीने नुकसानकारकच होता. सिंधू खोऱ्यातील नद्यांचे पाणी अडविण्याच्या दृष्टीने मोदी सरकारने गेल्या काही वर्षात नियोजनबद्ध प्रयत्न केले आहेत. पं.नेहरूंनी पाकिस्तानबरोबर केलेला सिंधू करार आणि त्यातील प्रमुख तरतूदी याची सखोल माहिती देणारा लेख या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. कार्यकर्त्यांनी हा विषय समजावून घेण्यासाठी या अंकातील संबंधित लेख आवर्जुन वाचावा.

देशात ऐतिहासिक घडामोडी घडत असतानाच मा. मोदीजींच्या सरकारने जातवार जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हार्दिक आभार. त्यांनी अनेक दशकांची जनतेची मागणी पूर्ण केली. या निर्णयामुळे विविध समुदायांना विशेषतः ओबीसींना न्याय मिळणार आहे. काँग्रेस आघाडी सरकारने यापूर्वी २०११ च्या जनगणनेसोबत एक सामाजिक सर्व्हे केला होता. त्यावेळी जातींची नोंदणी केली होती, पण त्यामध्ये असंख्य चुका झाल्या व काँग्रेस आघाडी सरकारने हा डेटा कधी प्रसिद्ध केला नाही. जातवार जनगणनेबाबत काँग्रेस कधीच प्रामाणिक नव्हता. काँग्रेसने केवळ राजकारणासाठी जातवार जनगणनेची चर्चा केली. मोदी सरकारने मात्र इमानदारीने स्पष्ट निर्णय घेतला आहे. आता राष्ट्रीय जनगणनेसोबतच जातवार जनगणना होईल. ही जनगणना पूर्णपणे वैज्ञानिक पद्धतीने एआय तंत्रज्ञानाची मदत घेऊन केली जाणार आहे. भारतीय जनता पार्टीने जातवार जनगणनेला नेहमीच पाठिंबा दिला आहे. समाजातील मागासांना, वंचितांना न्याय मिळेल. सामाजिक न्यायासाठी मोदी सरकार हवेत चर्चा करत नाही तर प्रत्यक्ष ठोस कृती करते, हे मोदी सरकारने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

कल्पनेपेक्षा भयंकर शिक्षा करू ........ ०४



सिंधू पाणी वाटप करार हे धोरणात्मक अपयश ........ ०६



मुस्लिम महिलांच्या सक्षमीकरणाचा 'वक्फ मार्ग' ........ १०





वक्फ कायद्यातील दुरूस्तीचे दाऊदी बोहरा समाजाकडून स्वागत ........ १३



वक्फ कायद्यातील दुरूस्तीमुळे मुस्लिम महिलांना मिळणार फायदे ........ १४




अटलजींमधील सच्चा पत्रकार कायम राहिला ........ १९



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# कल्पनेपेक्षा भयंकर शिक्षा करू

> पहलगाम येथील झालेल्या हत्येनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत मोजक्या शब्दात दहशतवादी शक्तींना आणि या शक्तींना मदत करणाऱ्या पाकिस्तानसारख्या देशाला, देशांतर्गत मंडळींना मोजक्याच शब्दात इशारा दिला आहे. हा हल्ला घडवून आणणाऱ्यांना कल्पनेपेक्षाही भयंकर शिक्षा करू, असे पंतप्रधानांनी जाहीर केले आहे.



**पहलगाम** हल्ल्यानंतर साऱ्या जगाचे लक्ष भारताच्या उत्तराकडे लागले आहे. मोदी सरकार सत्तेत आल्यापासून सामान्य भारतीय नागरिकांवर झालेला हा पहिला दहशतवादी हल्ला आहे. गेल्या १० वर्षात भारतीय नागरीक दहशतवादी हल्ल्यांना विसरून गेले होते. २०१६ मध्ये पठाणकोट येथे झालेल हल्ला आणि २०१९ मध्ये काश्मीरमधील पुलवामा येथे सुरक्षादलाच्या जवानांच्या बसवर झालेला आत्मघाती हल्ला, या दोन घटना वगळता अतिरेक्यांना भारतात बॉम्बस्फोट अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या हल्ला घडविता आला नव्हता. यामुळेच पहलगाम हल्ल्याबाबत सर्वसामान्य माणसांकडून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. अशा दहशतवादी हल्ल्यांना भारत तितक्याच ताकदीने प्रत्युत्तर देतो हे दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानच्या लष्करशहांना चांगले ठाऊक झाले आहे. २०१६ चा सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९ चा एअर स्ट्राईक करूनही पाकिस्तानच्या लष्करशहांची खुमखुमी अजून जिरलेली नाही. जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही, या म्हणीप्रमाणेच पाकिस्तानच्या लष्करशहांचे वर्तन आहे. या हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी काय बोलतात, याकडे जगाचे लक्ष लागले होते. पंतप्रधान मोदी यांनी या हल्ल्याबाबतच्या आपल्या भावना दूरचित्रवाणी अथवा अन्य कोणत्याही प्रसारमाध्यमातून व्यक्त केल्या नाहीत. बिहारमध्ये झालेल्या एका जाहीर कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी या हल्ल्याबाबतची आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. 'हा हल्ला घडविणाऱ्या दहशतवाद्यांना आणि दहशतवाद्यांच्या पाठिराख्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा करू. या दहशतवाद्यांचे उरलेसुरले अड्डे नष्ट करून त्यांना जमिनीत गाडण्याची वेळ आली आहे.' अशा मोजक्याच शब्दात पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

२००४ ते २०१४ या १० वर्षाच्या काळात मनमोहन सिंग सरकार सत्तेत असताना अतिरेक्यांसाठी आओ–जाओ घर तुम्हारा अशीच स्थिती होती. मोदी सरकारने अंतर्गत सुरक्षा आणि गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम बनवून दहशतवादाला पायबंद घातला. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशातील मंडळींचाही बंदोबस्त केला. त्यामुळे आपल्या सुरक्षा यंत्रणांनी गेल्या १० वर्षात देशावरील हल्ल्याचे अनेक प्रयत्न उधळून लावले. पंतप्रधान मोदी यांच्या प्रतिक्रियेनंतर पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांमध्ये घबराट उडाली आहे. भारतातील सरकार पूर्वीच्या मनमाहेन



सिंग सरकारप्रमाणे आपल्या कारवाया सहन करणारी नाही, हे पाकिस्तानच्या लष्करशहांना ठाऊक आहे. सिंधु नदीतील पाणी वाटपाविषयी पाकिस्तानबरोबर १९६० मध्ये झालेला करार स्थगित करण्याची घोषणा करून भारताने पुढे काय काय होऊ शकते याची झलक दाखविली आहे.

काश्मिरमध्ये ३७० वे कलम रद्द केल्यानंतर दहशतवादी कारवायांना लगाम घालण्यात सुरक्षा यंत्रणांना यश मिळाले होते. काश्मिरमधील जनताही हळूहळू दहशतवाद्यांच्या पकडीतून बाहेर पडत होती. परिणामी काश्मिरमधील स्थानिकांकडून सुरक्षादलाच्या जवानांवर होणारे दगडफेकीचे प्रकार थांबले आहेत. काश्मिरमध्ये विकासकामांवर विषय लक्ष केंद्रीत करत मोदी सरकारने द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, पूल, बोगदे अशा पायाभूत सुविधा विकासकामांचा धडाकाच लावला होता. हिंसक घटनांना पायबंद बसल्यामुळे काश्मिरमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या प्रचंड वेगाने वाढली. त्याचा परिणाम काश्मिरमध्ये रोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण होण्यात झाला. दहशतवाद्यांच्या धमक्यांना न जुमानता काश्मिरमध्ये लोकसभा आणि विधानसभेसाठी लक्षणीय प्रमाणात मतदान झाले. हे चित्र पाहून अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या आश्रयदात्यांनी पहलगाम येथील हिंदू पर्यटकांवर हल्ला चढवला. या हल्ल्याचे पडसाद आंतरराष्ट्रीय पातळीवर दीर्घकाळ उमटत राहणार यात शंका नाही.

मोदी सरकारने तातडीने पाकिस्तानबरोबरचा सिंधू जल करार स्थगित करण्याची घोषणा केली आहे. दहशतवाद्यांना मदत करणे थांबवले जात नाही तोपर्यंत पाकिस्तानला सिंधू कराराद्वारे दिले जाणारे पाणी यापुढील काळात सोडले जाणार नाही, असे मोदी सरकारने स्पष्ट केले आहे. पाकिस्तानची सुमारे ८० टक्के शेती सिंधू नदीतून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून आहे. सिंधूचे पाणी रोखले तर पाकिस्तानच्या पंजाब आणि सिंध विभागात १७ लाख एकरपेक्षा अधिक जमीन वैराण वाळवंटासारखी बनणार आहे. जम्मू-काश्मीरच्या सिंधू खोऱ्यातून १५४.३ दशलक्ष एकर फूट पाणी पाकिस्तानच्या शेतीला पुरविले जात आहे. सिंधू नदीतून होणारा पाणीपुरवठा थांबवल्यास पाकिस्तानच्या शेती उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानातील तरबेला आणि मंगला या प्रमुख जलविद्युत केंद्रांना सिंधू खोऱ्यातूनच पाणी मिळते. सिंधू जल करार थांबवल्यास पाकिस्तानच्या वीज निर्मितीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानातील कराची, लाहौर आणि मुल्तान ही मोठी शहरे पाण्यासाठी सिंधू नदीवर अवलंबून आहेत. अटारी सीमा तातडीने बंद करण्याचा निर्णयही मोदी सरकारने घेतला आहे. पहलगाम येथील हल्ल्यामागे कोणत्या शक्ती आहेत त्या शोधून काढण्यासाठी सुरक्षा यंत्रणा तडफेने कामाला लागल्या आहेत. या अतिरेक्यांना सहाय्य करणाऱ्या काश्मीरमधील मंडळींना शोधण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी आपली सारी क्षमता पणास लावली आहे.

मोदी सरकारने या विषयावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठकीचेही आयोजन केले होते. विरोधी पक्षाला विश्वासात घेऊन केंद्र सरकार दहशतवादी शक्तींना धडा शिकवण्यासाठी सज्ज झाले आहे. पाकिस्तान सरकारला बलुचिस्तानमधील उठावामुळे राजकीय पेचप्रसंगाला सामोरे जावे लागत आहे. या स्थितीत केंद्र सरकार पाकिस्तानला कायमची अद्दल घडविण्यासाठी निर्धाराने एक-एक पाऊल पुढे टाकत आहे. दहशतवादाला दया-माया दाखविली जाणार नाही, हे मोदी सरकारने यापूर्वीही अनेकदा दाखवले आहेच. त्याचाच पुढचा भाग येत्या काही दिवसात पाकिस्तानला पाहावा लागणार आहे.

**दण्डो हि शासनायैव, धर्मस्यैव हि शासनम् ।**
**दण्डं विना न तिष्ठेति, लोकस्य धर्मशासनम् ।।**

अपराध करणाऱ्याला शासन करणे हे राज्यकर्त्याचे कर्तव्य असते. धर्माला अनुसरूनच राज्यकर्त्याने राज्य कारभार करणे आवश्यक असते. असा या श्लोकाचा भावार्थ आहे. या श्लोकाप्रमाणे मोदी सरकार भारताकडे सदैव वाकड्या नजरेने पाहणाऱ्या शक्तींना कठोर शासन करेल असा विश्वास सामान्य भारतीयांना वाटतो आहे. ■

# सिंधू पाणी वाटप करार हे धोरणात्मक अपयश



सिंधू जलसंधी आजवर शांततेचा करार म्हणून ओळखला जात असला, तरी वस्तुस्थिती अशी आहे की, हा करार भारतासाठी एक धोरणात्मक अपयश होता, आणि त्याची जबाबदारी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर येते. या करारात भारताने आपले जल अधिकार अक्षरशः गमावले. भारताच्या भूमीत उगम पावणाऱ्या एकूण पाण्याच्या सुमारे ८०% हिस्सा पाकिस्तानला (पश्चिमेकडील नद्या- सिंधू, झेलम, चेनाब) देऊन, फक्त २०% पाणी (पूर्व नद्या- रावी, बियास, सतलज) स्वतःकडे ठेवले. हे जलनीतीतील गंभीर अपयश होते, जे पुढील अनेक दशकांमध्ये भारतासाठी बंधनात्मक ठरले.

**नेहरूंच्या** या निर्णयाला कोणते व्यापक राष्ट्रीय हितसंबंध, दीर्घकालीन दृष्टिकोन किंवा जलसुरक्षेचा विचार होता, असे आज सांगणे कठीण आहे. पाकिस्तानकडून सातत्याने होणाऱ्या सीमापार दहशतीला आणि भारतविरोधी कारवायांना उत्तर देण्यासाठी साधनं असताना, नेहरू सरकारने ती बांधून घेतली. सिंधू जलसंधी म्हणजे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणातील अनेक चुकांपैकी एक ऐतिहासिक चूक होती, जी नंतरच्या काँग्रेस सरकारांनीही दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला नाही. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानच्या आक्रमक आणि भारत विरोधी धोरणांना उत्तर देण्यासाठी सिंधू जलसंधीवर आघात करण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत पाकिस्तान आपल्या भूमीतून चालणाऱ्या आतंकवादाला कायमस्वरूपी थांबवत नाही, तोपर्यंत हा करार भारताच्या दृष्टीने अमान्य ठरवण्यात आला आहे.

या निर्णयामुळे भारताला पश्चिमेकडील नद्यांच्या पाण्यावर अधिक नियंत्रण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. किशनगंगा, रतले आणि पाकल दुल यांसारख्या पाणी प्रकल्पांवरील पाकिस्तानच्या आक्षेपांना आता गांभीर्याने घेण्याची आवश्यकता उरलेली नाही. पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील शेती सिंधूच्या पाण्यावर अवलंबून असल्याने, या स्थगितीचा थेट परिणाम त्याच्या



कृषी अर्थव्यवस्थेवर होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काही वर्षांपूर्वी पंजाबमध्ये घेतलेल्या सभेत म्हटले होते, भारताचे कष्टकरी सुपुत्र हे पाणी सोनं करतील, जर आपण ते भारताच्या शेतांमध्ये वळवले. आज, पाकिस्तानच्या अडमुठ वर्तनामुळे हे शब्द सत्यात उतरवण्याची वेळ भारतावर आली आहे.

### ❶ पाण्यावरून पडलेले विभाजनानंतरचे सावट

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानला भीती वाटू लागली की भारत आपला पाणीपुरवठा थांबवेल. त्यामुळे सिंधूच्या पाण्याच्या वाटपावरून दोन्ही देशांमध्ये कुरबुरी सुरू झाल्या. हा प्रश्न चिघळू लागल्यावर जागतिक बँकेने यात लक्ष घालून मध्यस्थीची भूमिका स्वीकारली. १९५१ मध्ये वॉशिंग्टन येथील जागतिक बँकेचे अध्यक्ष यूजिन ब्लॅक यांनी या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही देशांमध्ये चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे चर्चा सुरू राहिल्या. अखेर १९ सप्टेंबर १९६० रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू कराचीत गेले आणि त्यांनी पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्यासोबत सिंधू जलसंधीवर स्वाक्षऱ्या केल्या. विशेष म्हणजे, अमेरिका व ब्रिटन यांसारख्या पाश्चात्त्य राष्ट्रांच्या राजकीय दबावामुळे आणि जागतिक बँकेच्या सक्रिय भूमिकेमुळे नेहरूंवर हा करार स्वीकारण्याचा अप्रत्यक्ष दबाव होता. कराची येथे १९ सप्टेंबर १९६० रोजी भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानी राष्ट्रपती अयुब खान (मधोमध) यांनी सिंधू जलसंधी करारावर स्वाक्षरी करताना. संदर्भ: द हिंदू

### ❷ एकतर्फी वाटप – पाकिस्तानला ८०%, भारताला फक्त २०%

कराराच्या रूपरेषेनुसार, सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्याचे वाटप दोन्ही देशांत करण्यात आले. वरवर पाहता वाटप समसमान वाटले तरी प्रत्यक्षात सिंधू खोऱ्यातील एकूण पाण्याच्या सुमारे ८०% पाणी पाकिस्तानला देण्यात आले, तर भारताला फक्त १९–२०% पाण्यावर हक्क देण्यात आला. हा करार भारताच्या दीर्घकालीन जलसुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरला.

### ❸ नद्यांचे नियंत्रण आणि भारताची मर्यादित परवानगी

या करारानुसार बियास, रावी आणि सतलज या तीन पूर्व नद्यांवर भारताचा हक्क राहिला, तर सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिम नद्यांवर पाकिस्तानचा अधिकार राहिला. विशेष म्हणजे सिंधू नदी भारतातून वाहून पाकिस्तानात जाते, तरीही भारताला केवळ वीजनिर्मितीसाठी मर्यादित प्रमाणात (२०% पर्यंत) पाणी वापरण्याची मुभा देण्यात आली. तेही शेतीसाठी वापर न करता, फक्त पुढे प्रवाहित करण्याच्या अटीवर.

### ❹ भारताचा नवा निर्णय – पाणी अडवण्याची क्षमता



भारत सरकारच्या नुकत्याच घेतलेल्या निर्णायक भूमिकेनुसार, आता भारत आपल्याच हद्दीत मोठ्या प्रमाणात धरणं आणि जलसाठे उभारू शकतो. सिंधूच्या प्रवाहावर नियंत्रण मिळवून, आता सध्याचे तलाव, सरोवरे, आणि धरणं पूर्ण क्षमतेने भरता येतील. उन्हाळ्यात बर्फ वितळून जे पाणी पाकिस्तानात जात असे, ते आता भारतातच साठवता येईल. पाकिस्तानला पूर्वसूचना न देता हे पाणी नियोजनानुसार सोडले जाईल. आज जरी परिणाम लगेच दिसणार नसले, तरी काही वर्षांत पाकिस्तानला या निर्णयाची झळ पोहोचणार, हे निश्चित.

### ❺ चीनचा हस्तक्षेप आणि पर्यावरणीय दुर्लक्ष

सिंधू नदीचा उगम तिबेटमधील मान सरोवराजवळ होतो आणि ती भारतातून पाकिस्तानात प्रवेश करते. तरीही चीन या कराराचा भाग नाही. डेमचोकजवळ चीनने सिंधूवर धरण बांधून पाण्याचा प्रवाह तिबेटकडे वळवला आहे. त्यामुळे आज सिंधूच्या खोऱ्यातून मुख्यत्वे झंझकार व शोक या उपनद्या वाहतात. करारातील आणखी एक गंभीर त्रुटी म्हणजे हवामानबदल, पर्यावरणीय प्रभाव, आणि जलस्रोतांवरील दीर्घकालीन परिणाम यांचा विचार केलेला नाही. कोणत्या देशाने किती धरणे बांधावी यावर कोणतेही निर्बंध नाहीत.

### ❻ संसदेत चर्चा नाही, आकड्यांना आधार नाही

या करारावर (१९६० मध्ये) स्वाक्षऱ्या होण्यापूर्वी भारतीय संसदेमध्ये कोणतीही खुली चर्चा झाली नव्हती. पाण्याच्या वाटपासाठी कोणताही वैज्ञानिक, तांत्रिक किंवा भौगोलिक आधार नव्हता. जम्मू–कश्मीरचा ४२% हिस्सा सिंधू खोऱ्यात असूनही त्याचा हक्क डावलण्यात आला. गुजरातमधील कच्छ परिसरही सिंधूच्या प्रभावाखाली असून त्याचा विचारही झालेला नाही. हा करार पूर्णपणे पाकिस्तानधार्जिणा होता आणि पंडित नेहरूंनी तो देशाच्या माथी मारला.

### ❼ सिंधूची भौगोलिक माहिती आणि काश्मीरचा खरा संदर्भ

सिंधू नदीची लांबी गंगा आणि ब्रह्मपुत्रेपेक्षा अधिक आहे– तब्बल ३१०० किमी. मानसरोवराजवळ तिबेटमध्ये उगम पावून ती लडाखमधून भारतात येते आणि गिलगिट–बल्टिस्तानमार्गे दक्षिणेकडे पाकिस्तानच्या कराची येथे अरबी समुद्रात मिळते. सिंधू ही नदी भारताच्या आणि विशेष करून हिंदूंच्या अस्मितेचं प्रतीक आहे.

आपल्याला शाळेत नाईल नदी इजिप्तची जीवनवाहिनी आहे असे शिकवले जाते. त्याच प्रमाणे सिंधू नसती तर पाकिस्तान ही एक वाळवंटी भूमी ठरली असती. म्हणूनच पाकिस्तानची काश्मीरवरची आकांक्षा ही केवळ धार्मिक नाही, ती या नद्यांच्या पाण्यावरचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीची धडपड आहे.

### पाच नद्या आणि पाण्याचं राजकारण

सिंधू नदीला मिळणाऱ्या उपनद्यांमध्ये झेलम, चिनाब, रावी, बियास आणि सतलज या पाच प्रमुख नद्यांचा समावेश होतो. या सर्व नद्या पाकिस्तानातील पंजाब प्रांतात मिथानकोट इथे सिंधूत एकत्र येतात. याच कारणामुळे या प्रांताचे नाव पंजाब – म्हणजे पाच नद्यांचा प्रदेश – असं पडलं आहे.

सिंधू जलसंधी करारानुसार, वरच्या म्हणजे उत्तर दिशेने वाहणाऱ्या तीन नद्या – सिंधू, झेलम आणि चिनाब– पाकिस्तानच्या वापरासाठी ठेवण्यात आल्या, तर खालच्या भागातून वाहणाऱ्या रावी, बियास आणि सतलज या भारताच्या मालकीच्या ठरवण्यात आल्या. या बदल्यात भारताने पाकिस्तानला एक ठराविक आर्थिक मोबदला

दिला, आणि नव्या सिंचन प्रकल्पांसाठी पर्यायी व्यवस्था उभारण्यासाठी दहा वर्षांचा कालावधी दिला. या दरम्यान, पाकिस्तानने या पाण्याचा पुनर्वापर वेगवेगळ्या मार्गांनी करावा अशी तरतूद होती.

तसेच, सिंधू नदी भारताच्या भूमीवरून वाहते, यामुळे तिच्या एकूण पाण्यापैकी २०% पर्यंत वापर – तोही काही अटींमध्ये – भारताला वीज निर्मिती, जल वाहतूक आणि पाणीपुरवठा यासाठी करण्याची मुभा देण्यात आली. अखेर १९७० मध्ये या संधीनुसार नद्यांचे भौतिक विभाजन करण्यात आले. याला पाणी वाटप म्हणण्यापेक्षा नद्यांचे भूगोलशास्त्रीय विभाजन म्हणणे अधिक योग्य ठरेल. हा फरक नकाशावर पाहिल्यास अधिक स्पष्ट होतो.

### पाकिस्तानची दुटप्पी भूमिका आणि भारताच्या प्रगतीवर घातलेला आडवा हात

करारात भारताला वरच्या तीन नद्यांमधूनही काही प्रमाणात पाणी वापरण्याची परवानगी असूनही, प्रत्येक वेळी भारताने एखादा प्रकल्प हाती घेतला, की पाकिस्तानने त्यावर आक्षेप घेतला. अनेक वेळा त्यांनी जागतिक बँकेसमोर किंवा इतर आंतरराष्ट्रीय लवादांपुढे तक्रारी दाखल केल्या. त्यामुळे संबंधित प्रकल्पांच्या मंजुरी आणि अंमलबजावणीत वर्षानुवर्षे उशीर झाला.

याचा थेट परिणाम जम्मू–काश्मीरमधील जल प्रकल्पांवर झाला. विकासकामांची गती ठप्प झाली, तर लवाद चालवण्याचा खर्च आणि प्रकल्प रेंगाळल्यामुळे निर्माण होणारी ऑपरेशनल कॉस्ट वाढतच गेली.

### टूलबुल प्रकल्पाचे उदाहरण : संधी गमावलेली

वुल्लर सरोवराजवळील झेलम नदीवर बारामुल्ला जिल्ह्यात टूलबुल नेव्हिगेशन प्रोजेक्ट उभारण्याचा प्रस्ताव भारताने मांडला होता. या प्रकल्पामुळे झेलम नदी आटते त्या हिवाळी काळात जल साठवणूक करता येणार होती, आणि त्यामुळे संपूर्ण खोऱ्यातील पाणीटंचाई सोडवता आली असती.

मात्र, पाकिस्तानने लगेच यावर आक्षेप घेतला. प्रकरण आंतरराष्ट्रीय लवादात गेले. त्यांनी असा खोटा दावा केला की, वरच्या तीन नद्यांवर भारताला कोणताही वापर करता येणार नाही. हे संपूर्णपणे कराराच्या तरतुदींना छेद देणारे आणि भारताच्या सार्वभौम अधिकारांना झुगारून टाकणारे होते.

दुसरे उदाहरण बगलीहार प्रकल्पाचे. १९९९ साली त्याच्याही आराखड्याला असाच आक्षेप पाकिस्तानने घेतला. त्याचा निकाल शेवटी २००१ साली लागला.

### किशनगंगा आणि रातले प्रकल्प

मोदी सरकारच्या कार्यकाळात भारताला झेलम नदीवर किशनगंगा प्रकल्प सुरू करण्याची अखेर मंजुरी मिळाली. गुरेझ परिसरात, प्रवाहाच्या वेगाचा उपयोग करून सुमारे ३३० मेगावॅट वीजनिर्मिती करणारा हा प्रकल्प भारतीय दृष्टिकोनातून एक महत्त्वपूर्ण यश ठरतो. याचप्रमाणे चिनाब नदीवर उभारण्यात येणाऱ्या रातले वीज प्रकल्पालाही अशाच स्वरूपाची मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पंजाबमधील एका भाषणात उच्चारलेले शब्द – खून और पानी एक साथ नहीं बह सकते – हे केवळ भावनिक विधान नव्हते, तर भारताच्या नव्या जलधोरणाचा स्पष्ट संकेत होते.

### सिंधू जलसंधी – एक राजनैतिक चूक?

सिंधू जलसंधी ही भारताच्या परराष्ट्र धोरणातील एक गंभीर चूक होती, असा मतप्रवाह अनेक अभ्यासक, माजी अधिकारी आणि धोरण विश्लेषक व्यक्त करतात. या करारामुळे भारताने केवळ आपल्या पाण्याच्या हक्कांवर मर्यादा स्वीकारल्या नाहीत, तर आणखी एक धक्कादायक बाब घडली – भारताने पाकिस्तानला त्यांच्या जलसंपत्तीच्या पायाभूत सुविधांसाठी आर्थिक मदतही केली होती.

हो, हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल, पण १९६० साली झालेल्या या कराराअंतर्गत भारताने पाकिस्तानला ८३ कोटी रुपये (त्या काळात अंदाजे ६२ दशलक्ष डॉलर्स) दिले. ही रक्कम भारताच्या तिजोरीतून पाकिस्तानच्या जलसिंचन आणि जलसाठा बांधकामासाठी देण्यात आली, त्याचप्रमाणे धरणं, कालवे, जलवाहिनी व्यवस्था यासाठी. कारण रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील नद्या भारताच्या ताब्यात जाणार असल्यामुळे, पाकिस्तानला सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांवर नव्याने जलप्रणाली उभी करावी लागणार होती. ■

# मुस्लिम महिलांच्या सक्षमीकरणाचा 'वक्फ मार्ग'




● **विजया रहाटकर**, अध्यक्ष - राष्ट्रीय महिला आयोग

वादळी चर्चेनंतर संसदेमध्ये वक्फ सुधारणा विधेयक नुकताच मंजूर झाले आहे. कायद्यामागची भूमिका, त्यावरील आक्षेप यावर सांगोपांग चर्चा झालीच आहे आणि आपण ती सर्वांनी ऐकली असेलच. मुस्लिमांच्या धार्मिक बाबतीत सरकार हस्तक्षेप करू पाहतेय, असा साधारणतः विरोधकांचा सूर होता, तर वक्फ कायद्यातील सुधारणा या प्रामुख्याने कोट्यावधींच्या मालमत्तांचे पारदर्शक व्यवस्थापन आणि त्याचा मुस्लिम समाजासाठी उत्तम वापर यासाठीच आहे, असे आग्रही समर्थन केंद्र सरकारने केले आहे.

**या** सर्व चर्चेमध्ये या नव्या कायद्यात मुस्लिम महिलांसाठी केलेल्या अत्यंत महत्वाच्या तरतुदीवर फार चर्चा झालेली दिसत नाही. साधारणतः सांगायचे झाले तर मुस्लिम महिलांची स्थिती फार काही नीट नाही. धार्मिक अवडंबराखाली पिचलेल्या या महिलांचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय स्थान खचलेले आहे. शैक्षणिक प्रगती नाही, पुरेसे आर्थिक स्वातंत्र्य नाही, अशी त्यांची अवस्था आहे. न्यायमूर्ती सच्चर समितीच्या अहवालानेही तसेच अधोरेखित केलेले आहे. या पार्श्वभूमीवर नव्या सुधारणावादी कायद्यातील महिलांशी संबंधित तरतूदी पाहूयात :

केंद्रीय वक्फ परिषद आणि राज्य वक्फ मंडळांमध्ये किमान दोन मुस्लिम महिलांचा समावेश असावा. या तरतुदीने मुस्लिम महिलांना निर्णयप्रक्रियेत सक्रिय भूमिका मिळेल. यापूर्वी, वक्फ मंडळे पुरुषप्रधान होती आणि महिलांचा

## समानतेच्या दिशेने...

**या तरतुदी पाहिल्यावर लक्षात येईल की, वक्फ सुधारणा कायदा हा मुस्लिम महिलांसाठी केवळ कायदेशीर सुधारणा नाही, तर सामाजिक समानता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. मुस्लिमांना महिलांच्या हक्क मिळविण्याच्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा आहे. महिलांना वक्फ मंडळात प्रतिनिधित्व, वारसाहक्कांचे, आर्थिक सहाय्य आणि कायदेशीर मार्गदर्शन यासारख्या तरतूदीने त्यांची स्थिती मजबूत तर होईलच पण त्याशिवाय संपूर्ण समाजाला सुधारणावादी विकासाच्या दिशेने जाता येईल. या सकारात्मक बदलांचे स्वागत करण्याची आणि मुस्लिम महिलांच्या उज्वल भविष्यासाठी एकत्रितपणे काम करण्याची हीच योग्य वेळ आहे. तिहेरी तलाकविरुद्ध कठोर कायदा, हज यात्रेला जाण्यासाठी पुरूष संरक्षक (मेहरम) सोबत असण्याचे बंधन दूर करणे, मुस्लिम युवतींसाठी 'शादी शगुन योजना', कोणताही भेदभाव न करता सर्व योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविणे या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर वक्फ बोर्डाच्या व्यवस्थापनात प्रतिनिधित्व आणि त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नातून मुस्लिम महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे.**

आवाज बहुतेकवेळा ऐकला जात नव्हता. आता या सर्वसमावेशक प्रतिनिधित्वामुळे महिलांना त्यांच्या समस्या सांगण्याची आणि मागण्या मांडण्याची संधी मिळेल.

'वक्फ अलाल-औलाद' ही अशी व्यवस्था आहे, ज्यामध्ये दान केलेल्या मालमत्तेचा काही भाग किंवा त्यापासून मिळणारे उत्पन्न दात्याच्या कुटुंबासाठी आणि वारसांसाठी राखून ठेवला जातो. यापूर्वी, या व्यवस्थेत बहुतेकवेळा महिलांच्या वारसाहक्कांवर गदा येत असे. मात्र, नव्या सुधारित कायद्यात स्पष्ट केले आहे, की 'वक्फ अलाल- ५- औलाद' करताना महिलांसह सर्व वारसांच्या हक्कांचे उल्लंघन करता येणार नाही. या स्पष्ट तरतुदीमुळे मुस्लिम महिलांना त्यांच्या पैतृक मालमत्तेत योग्य वाटा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ही तरतूद मुस्लिम महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला मोठी ताकद देणारी आहे.

वक्फ अलाल-औलादच्या उत्पन्नाचा उपयोग विधवा, घटस्फोटित आणि अनाथांसाठी करण्याची अत्यंत महत्वाची तरतूद नव्या कायद्यात केली आहे. सामाजिक न्यायाच्या दिशेने एक मोठ्या परिवर्तनाचे पाऊल आहे. यामुळे मुस्लिमांतील सर्वात कमकुवत घटकांना, विशेषतः महिलांना आर्थिक सहाय्य मिळेल. त्यांना सन्मानाने जीवन तर जगता येईलच, पण देशाच्या मुख्य प्रवाहात येणे सुकर होईल.

नव्या कायद्याने वक्फ मालमत्तांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शी करण्यासाठी डिजिटल साधने आणि केंद्रीकृत ऑनलाइन पोर्टलची सुरुवात करण्यात येणार आहे. या प्रणालीमुळे मुस्लिम महिलांना त्यांच्या मालमत्तेशी संबंधित माहिती सहज मिळवता येईल आणि कायदेशीर सहाय्य घेण्यास मदत होईल. या पारदर्शकतेमुळे हक्कांबाबत जागरुकता येईल आणि वारसाहक्क, कौटुंबिक विवाद आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये त्यांना न्याय मिळण्यात किंवा न्याय्य हक्क मिळविण्यात मोलाची मदत होईल.

मुस्लिमांमध्येही शिया, सुन्नी, बोहरा, आगाखानी, पसमंदा अशा अनेक जाती, उपजाती, पंथ आणि मागासलेले समाजघटक आहेत. या घटकांचेही प्रतिनिधित्व नव्या कायद्याने निश्चित केले आहे. त्याचाही दीर्घकालीन सकारात्मक परिणाम या घटकांतील महिलांवर होईल.

वक्फ मालमत्तांचा उपयोग ऐतिहासिकदृष्ट्या शिक्षण, आरोग्य आणि धार्मिक विकासासाठी केला गेला आहे. पण आता त्याची व्याप्ती वाढून मुस्लिम बालिकांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीपश्चता वैद्यकीय सुविधा, कौशल्य प्रशिक्षण, सूक्ष्म वित्त सहाय्यासाठी योजना, विधि मार्गदर्शन केंद्रे, विधवांसाठी पेन्शन योजना यासारख्या अनेक कल्याणकारी पावलांचा समावेश झाला आहे. ■

# गरीब मुस्लिमांसाठी नवा वक्फ कायदा फायद्याचा

● अरशद अली, प्रदेश कार्यकारिणी सदस्य

**वक्फ** बोर्ड विधेयक दुरुस्ती संसदेत सादर झाल्यापासून विरोधी पक्ष त्याला विरोध करत होते. विरोधकांच्या याच भूमिकेमुळे गेल्या ७० वर्षांपासून मुस्लिमांची अवस्था वाईट झाली आहे. मुस्लिमांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय निकषांवर देशातील सर्वात खालच्या स्तरावर ठेवण्यात आले आहे. वक्फ कायद्याच्या निमित्ताने विरोधी पक्ष आणि काँग्रेससारखे संकुचित विचारसरणीचे पक्ष खालच्या पातळीचे राजकारण करत आहेत.

मोदी सरकारने केलेल्या या विधेयक दुरुस्तीमुळे वक्फच्या मालमत्तेत निश्चितच बदल घडून येईल. त्यांचा नव्याने विकास केला जाईल आणि शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, सामाजिक इमारती बांधल्या जातील. फक्त आणि फक्त गरीब मुस्लिमांना यामुळे मोठे फायदे मिळतील. वक्फ दुरुस्ती विधेयकामुळे सामान्य मुस्लिमांचे कोणतेही नुकसान होणार नाही. ज्या वक्फ भू–माफियांनी कोट्यवधी रुपयांच्या जमिनी बळकावल्या आहेत त्यांचे नुकसान होईल. ७० वर्षांपासून वक्फ बोर्डाच्या सर्वोच्च पदांवर बसून काँग्रेस पक्षाचे पाय चाटणाऱ्या भूमाफियांनी त्यांच्या मालमत्तांचे मोठे नुकसान केले आहे.

वक्फ मंडळांनी मुस्लिम समाजातील गरजू आणि शेवटच्या रांगेत उभा असलेला गरीब मुस्लिम व्यक्तीवर अन्यायच केला. या माफियांनी कोट्यवधींचे राजवाडे बांधले आहेत आणि गरिबांचे हक्क हिसकावून बेकायदा मालमत्ता जमा केल्या आहेत. वक्फ बोर्डाने राखलेल्या अल्लाहच्या नावाने दिलेल्या मालमत्ता या माफियांनी स्वतःची मालमत्ता म्हणून वापरल्या आहेत. मुस्लिम समुदायाच्या जमिनींवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९५४ मध्ये निर्माण झालेल्या वक्फ बोर्डात केवळ आजच्या मोदी सरकारनेच नव्हे तर १९९५ मध्ये काँग्रेसचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंह राव आणि २०१३ मध्ये काँग्रेसचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीही सुधारणा केल्या. ही दुरुस्ती केवळ आणि केवळ मतपेढीच्या राजकारणासाठी करण्यात आली होती. जेणेकरून गरीब मुस्लिमांच्या अज्ञानाचा फायदा घेता येईल. तथाकथित मुस्लिम समाजातील भू–माफिया आणि मुस्लिम समाजाच्या मतांच्या नावाखाली आपली तिजोरी भरणाऱ्या हायकमांड मौलानांना अमर्याद अधिकार मिळाले होते. ज्याचा थेट फायदा माफियांना झाला आणि त्याचा गरीब मुस्लिमांशी काहीही संबंध नव्हता.

मोदी सरकारने आज या विधेयकात केलेल्या दुरुस्तीमुळे वक्फ मालमत्तांचे चांगले व्यवस्थापन करणे तर शक्य होईलच, शिवाय जिल्हा मुख्यालयातही मालमत्तांची नोंदणी केली जाईल. तसेच या मालमत्तांचा योग्य वापर करून वक्फ मंडळांचे उत्पन्नही वाढविता येईल. यासोबतच, महिलांचा आदर करणाऱ्या मोदी सरकारने वक्फ बोर्डाच्या सदस्य म्हणून महिलांचीही नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. पूर्वी महिलांना वक्फ मंडळांमध्ये कसलेच स्थान नव्हते. नेहमीच दुर्लक्षित राहिलेल्या बोहरा आणि आगाखानी समुदायांसाठी एक स्वतंत्र वक्फ बोर्ड स्थापन केले जाईल.

नव्या वक्फ कायद्यामुळे वक्फ बोर्डाच्या मालमत्तेच्या देखभाल आणि देखरेखीमध्ये पारदर्शकता येईल. जिथे वक्फ बोर्डात बसलेले सोसायटीचे कंत्राटदार आणि मुतवल्ली वर्षानुवर्षे या मालमत्ता त्यांच्या जवळच्यांना आणि नातेवाईकांना कवडीमोल किमतीत भाड्याने देत होते जे खरोखर हक्कदार होते त्यांना त्याचा फायदा घेण्यापासून वंचित ठेवले जात होते. आज या विधेयकातील दुरुस्तीवर, देशाच्या प्रगतीला स्वतःची प्रगती मानणारे हक्कदार मुस्लिम समुदाय आणि देशभक्त मुस्लिम या विधेयकाला मोदी सरकारचा ऐतिहासिक निर्णय मानत आहेत.

वक्फ बोर्डाच्या मालमत्ता बेकायदेशीर कब्ज्यातून मुक्त करणारे आणि गरीब पात्र मुस्लिमांना त्यांचे हक्क देणारे हे दुरुस्ती विधेयक देशातील मुस्लिम समुदायाच्या प्रगतीमध्ये एक 'मैलाचा दगड' ठरेल, यात काहीच शंका नाही. या विधेयकाबाबत सामान्य मुस्लिमांच्या मनात असलेले गैरसमज हळूहळू दूर होतील, याची खात्री आहे. ■

# वक्फ कायद्यातील दुरूस्तीचे दाऊदी बोहरा समाजाकडून स्वागत



**दाऊदी** बोहरा समुदायाच्या शिष्टमंडळाने अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत शिष्टमंडळाने वक्फ कायद्यात सुधारणा केल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांचे आभार मानले. आमची अनेक वर्षांची मागणी पंतप्रधान मोदी यांनी पूर्ण केली, असे या शिष्टमंडळाद्वारे पंतप्रधानांना सांगण्यात आले. वक्फ कायद्यातील दुरुस्तीमुळे मुस्लिम समाजातील अल्पसंख्य समुदायाचा फायदा होणार आहे, असेही या शिष्टमंडळाने म्हटले आहे. 'सबका साथ, सबका विकास' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संकल्पना या दुरुस्ती विधेयकामुळे प्रत्यक्षात येणार आहे. दाऊदी बोहरा समाजातील डॉक्टर, प्राध्यापक, उद्योजक अशा विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचा या शिष्टमंडळात समावेश होता. या समाजातील अनेकांच्या मालमत्तांवर वक्फ मंडळांनी चुकीच्या पद्धतीने हक्क सांगितल्यामुळे अनेकांना आपल्या मालमत्तांवर पाणी सोडावे लागले, असे शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निदर्शनास आणून दिले. याबाबतची अनेक उदाहरणेही शिष्टमंडळाने यावेळी दिली. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी दाऊदी बोहरा समुदायाकडून समाजोपयोगी उपक्रमांसाठी दिल्या जाणाऱ्या अर्थसहाय्याची प्रशंसा केली. वक्फ कायद्यात दुरुस्ती करण्याचा विचार सुरू झाला तेव्हा मी दाऊदी बोहरा समुदायातील सय्यदना मुफ्फदल सैफुद्दीन यांच्याशी सर्व प्रथम चर्चा केली, त्यांनी वक्फ कायद्यात दुरुस्ती करण्यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले, असे पंतप्रधान मोदी यांनी शिष्टमंडळाला सांगितले. वक्फ दुरुस्ती विधेयकामुळे मुस्लिम महिलांचा विषयत: विधवांचा फायदा होणार असल्याचेही पंतप्रधानांनी यावेळी नमूद केले. ■

# वक्फ कायद्यातील दुरूस्तीमुळे मुस्लिम महिलांना मिळणार अनेक फायदे




**वक्फ** कायद्यात मोदी सरकारने केलेल्या दुरुस्तीमुळे मुस्लिम महिलांचे सबलीकरण होणार आहे. वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ मधील सर्वात मोठी तरतूद म्हणजे मुस्लिम महिलांच्या कुटुंबातील वारसा हक्काचे संरक्षण करण्यात आले आहे. एखाद्या मुस्लिम व्यक्तीला आपली मालमत्ता वक्फला द्यायची असेल तर त्या कुटुंबातील महिलेला वारसा हक्कांनुसार मिळणारी मालमत्ता देऊनच वक्फला द्यावी लागेल. मुस्लिम महिलेला तिचा संपत्तीतील वाटा नाकारण्यासाठी एखादी मालमत्ता वक्फ देण्याचा मार्ग अनुसरला जात असे. त्यावर मोदी सरकारच्या दुरुस्तीमुळे बंदी आली आहे. मुस्लिम धर्मातील विधवा, घटस्फोटीत महिला, अनाथ महिला यांना आर्थिक आधार देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. वक्फ मंडळे आपल्या मालमत्तेतून वर उल्लेख केलेल्या महिलांना अर्थसहाय्य करू शकतात, अशी तरतूद दुरुस्ती विधेयकातील कलम ३ (आर) (iv) मध्ये करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे मुस्लिम महिलांना आणि त्यांच्या मुलांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य मिळू शकणार आहे.

वक्फ विधेयकातील दुरुस्तीनुसार वक्फ मंडळाच्या प्रशासनात महिलांचा सहभाग वाढवण्यात आला आहे. राज्य वक्फ मंडळांमध्ये आणि केंद्रीय वक्फ परिषदेत दोन मुस्लिम महिलांचा समावेश असलाच पाहिजे, अशी तरतूद अनुक्रमे कलम १४ आणि कलम ९ द्वारे करण्यात आली आहे. वक्फ मालमत्तांचा विनीयोग कसा व्हावा, यासाठीच्या निर्णय प्रक्रियेत मुस्लिम महिलांचा सहभाग या कायद्यातील दुरुस्तीमुळे वाढणार आहे. मुस्लिम मुलींना, विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती, मुस्लिम महिलांना आरोग्य सुविधा, बाळंतपणातील वैद्यकीय गरजा, मुस्लिम महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, अर्थसहाय्य, घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये मुस्लिम महिलांना कायदेशीर सहाय्य अशा अनेक गोष्टी या कायद्यातील दुरुस्तीमुळे शक्य होणार आहेत. पूर्वीच्या वक्फ कायद्यात मुस्लिम महिलांचा कोठेच विचार करण्यात आला नव्हता. मुस्लिम महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात यासाठी मुस्लिम महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे आणि बचतगट निर्मितीची तरतूद दुरुस्ती विधेयकात करण्यात आली आहे. मुस्लिम धर्मातील विधवा, घटस्फोटीत महिलांना विविध कारणांनी हलाखीचे जीवन जगावे लागते. अशा महिलांना वक्फ मंडळांच्या माध्यमातून अर्थसहाय्य झाले तर त्यांच्या आयुष्यातील आर्थिक हलाखी दूर होऊ शकते. ■

# जनताकेंद्री विचार हाच 'महसूल'चा ध्यास!




● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री

> महसूल विभागातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या पुणे येथे झालेल्या दोन दिवसांच्या महसूल परिषदेत नावीन्यपूर्ण कल्पना आणि जलद, पारदर्शी कामकाजावर भर देण्यात आला. अंमलबजावणीचा नवा दृष्टिकोन देणारी ही परिषद विभागातील बदलांची नांदी ठरेल, असा विश्वास आहे.

**राज्याच्या** महसूल विभागाचा भर लोकस्नेही कार्यपद्धती राबवण्यावर आहे. नागरिकांना सहज सेवा मिळाव्यात, तंत्रज्ञानाचा अधिक वापर, प्रभावी संवादाचे माध्यम व विभागातील विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण करणे ही मुख्य उद्दिष्टे आहेत. जर महसूल विभाग राज्याच्या विकासाचा कणा असेल, तर मग समाजनिष्ठेचे ध्येय ठेवावेच लागेल.

आजच्या घडीला महसूल विभाग महाराष्ट्रातील जनतेला सर्वाधिक ऑनलाइन सेवा देणारा व शासनाचा दररोज प्रत्यक्ष संपर्क घडविणारा महत्त्वाचा विभाग आहे. आमचे अधिकारी केवळ महसूलच नव्हे तर निवडणुकीच्या नियोजनापासून जमीन, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, दुष्काळ, टंचाई व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत सक्रिय आहेत. त्यामुळेच या विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रोत्साहन देण्यास, सक्षम ठेवण्यास प्राधान्य आहे.

'आम्ही जनतेचे सेवक आहोत' ही भावना ठेवून काम

करताना, मागील ९० दिवसांत मी स्वत: ८०० महसूल सुनावण्या घेतल्या. कित्येक सुनावण्या शिल्लक आहेत. पुढील तीन वर्षांत एकही सुनावणी प्रलंबित ठेवायची नाही, असा माझा प्रयत्न आहे. तालुक्यापासून ते आयुक्तालयापर्यंत एकही सुनावणी माझ्यापर्यंत येणार नाही अशी वेळ येईल, तेव्हा महसूल विभागात काहीतरी चांगले होत आहे, याचा दाखला मिळेल; असे संकेत सर्व अधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकाऱ्याने जिल्ह्यात प्रवास करून जनतेशी संवाद साधावा. त्यातून सकारात्मक परिणाम घडेल, असा विश्वास वाटतो.

नागरिकांची कामे वेळेत पूर्ण झाली पाहिजेत, हा दंडक घालून अधिकाऱ्यांनी लोकांना भेटण्याची वेळ ठरविली पाहिजे. तसा फलक कार्यालयाच्या बाहेर लावला पाहिजे. त्या वेळेत ठाण मांडून बसले पाहिजे, हा पहिला मुद्दा परिषदेच्या निमित्ताने अधोरेखित झाला. शेतकऱ्यांच्या उत्पादनासह उत्पन्नासाठी मोलाच्या ठरणाऱ्या पांदण रस्त्यांची योजना, 'छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व अभियानात' सक्रियपणे वर्षभरात १६०० शिबिरांचे नियोजन परिषदेतून होऊ शकले. योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी किंवा स्थानिक पातळीवरील नावीन्यपूर्ण उपक्रमांची सादरीकरणातून देवाणघेवाण झाली. चांगल्या कामाला प्रोत्साहन आणि चुकीसाठी तात्काळ कारवाई हा स्पष्ट इशारा दिला गेला. भंडाऱ्यातील अवैध वाळू उत्खनन प्रकरणात उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. महसूल विभागाच्या सेवा प्रणाली एकत्रित असलेल्या नव्या संकेतस्थळाचे सादरीकरण झाले. फेरफार, ७/१२, ई-पीक पाहणी, ई-चावडी, ई-मोजणी अशा सर्व सेवा यापुढे एकाच ठिकाणी मिळतील. ईप्सित, भू-प्रणाम केंद्र आणि ई-मोजणी २.० सारखे उपक्रम सुरू करण्यात आले. तंत्रकौशल्याचा मोठा बदल होऊ घातला आहे. 'सेवादूत' व 'ई-ग्राम संवाद'सारख्या उपक्रमांमधून ग्रामीण भागांतील नागरिकांना योजनांची माहिती आणि तक्रार निवारणाची सुविधा दिली जात आहे. विशेष 'जिल्हाधिकारी मार्गदर्शिका' प्रकाशित करण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तिला महसूल खात्याची 'गीता' असे गौरवाने संबोधले आहे. ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनातून साकार झाली आहे.

कार्यशाळेत जिल्हाधिकारी गुणवत्ता कार्यपद्धती जाहीर करण्यात आली. अनेक जिल्ह्यांमध्ये 'एक दिवस गावकऱ्यांसोबत', 'तुकडा' शेरा कमी करण्याची मोहीम, सुकर भूसंपादनासाठी संकेतस्थळ, आवश्यक कागदपत्रांच्या व प्रक्रियेच्या माहितीसाठी व्हॉट्सॲप चॅट बॉट, तक्रार नोंदवण्यासाठी टोल फ्री नंबर, क्यूआर कोड, दाखल्यांच्या ऑनलाइन नोंद प्रक्रियेसाठी गृहभेटी, ऑनलाइन सुनावण्यांसारखे उपक्रम राबवले गेले आहेत. ई-नझूल योजनेअंतर्गत घरबसल्या शासकीय परवानगी आणि दस्तऐवज मिळवण्याची व्यवस्था सुरू करण्यात आली. महाखनिज, ई क्यू जे कोर्ट, नक्षा, ऑनलाइन तलाठी दप्तर तपासणी, सहज प्रणाली, ई लोकशाही असे उपक्रम सादर करण्यात आले.

अधिकारी अनुभवातून शिकतात आणि हे अनुभवच शासनाला पुढील दिशा देतात, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या परिषदेत महत्त्वाच्या सूचना केल्या. महसूल विभागासाठी १०० दिवसांचा कार्यक्रम राबवण्यात येत असून त्याचा आढावा घेऊन १५ ऑगस्टनंतर नवीन धोरणांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सर्व शासकीय कार्यालयांचे सौर ऊर्जितीकरण, पीएम गतिशक्ती पोर्टलचा वापर, भूसंपादन प्रक्रियेत दलालांचा बंदोबस्त, विभागीय आयुक्तांसाठी स्वतंत्र प्रमुख कामगिरी निर्देशांक (केपीआय), जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम कामांचे संकलन, निधी वितरण सुलभ करणे, कायदे सुधारणा आणि प्रशासकीय पुनर्रचना या बाबींवर त्यांनी भर दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक महसुली विभागाला अभ्यास समित्या स्थापन करून सुधारित उपाययोजनांचा अहवाल तयार करण्यास सांगितले.

छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करून विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसूत्रीकरण करण्यात येणार आहे. विभागीय, जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावरील समित्यांची यादी तयार करून कालबाह्य समित्या रद्द करून, समान असलेल्या समित्यांचे एकत्रीकरण करून समित्यांची कार्यवाही प्रभावी करण्यात येणार आहे.

अमरावती विभागीय आयुक्तांना महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी प्रमुख कामगिरी निर्देशांक (केपीआय) तयार करायच्या सूचना दिल्या गेल्या. प्रस्तावित पदसंरचनेची निश्चिती करणे,



मानक कार्य तक्ते तयार करणे, संबंधित 'की परफॉर्मन्स इंडिकेटर्स'ची रचना या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. नागपूर विभागीय आयुक्तांना विविध जिल्हा प्रशासनाच्या उत्कृष्ट कामगिरीचा शोध घेऊन, त्यांचे मूल्यमापन व प्रमाणीकरण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. त्यासंदर्भात स्पष्ट कार्यप्रणाली मार्गदर्शक सूचना (एसओपी) तयार करण्यात येणार आहे. त्या केंद्र शासनाच्या अभिनव पोर्टलवर अपलोड करण्यात येतील. जेणेकरून त्यातील चांगल्या गोष्टी संपूर्ण राज्यभरात राबविता येतील. 'इज ऑफ लिव्हिंग' बाबत शिफारशीसाठी पुणे विभागीय आयुक्तांचा गट तयार करण्यात आला. ज्यामध्ये नागरिकांच्या अडचणी समजून त्या दूर करण्यासाठी कसे प्रयत्न करता येतील यावर विचार करण्यात येणार आहे. महसुली कायदे, नियम आणि प्रक्रियेत आवश्यक बदल सुचविण्याचे काम हा गट करेल. माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून, प्रत्येक प्रक्रिया सुलभ करण्यात यावी. कार्यप्रवाहामध्ये माहिती तंत्रज्ञान नागरिक केंद्रित व गतिमान प्रशासनाकरिता महसूल कायदे, नियम व प्रक्रियेत आवश्यक बदल सुचवावेत. महसूल विभागाच्या सर्वाधिक सेवा सॉफ्टवेअर-आधारित प्रक्रियांद्वारे पार पडतील, यासाठी सुसंगत माहिती तंत्रज्ञान प्रणालीची रचना करण्यात यावी व या संदर्भात 'हॅकाथॉन'चे आयोजन पुढील काळात करण्यात येईल. कोकण विभागीय आयुक्तांना जिल्हा नियोजन समितीला अधिक परिणामकारक कसे करता येईल याबाबत अभ्यास करण्याचा गृहपाठ देण्यात आला. त्याबाबतच्या आदर्श कार्यपद्धती आदी शिफारशी करण्यात याव्यात. उत्कृष्ट कार्यपद्धतींच्या आधारे नवीन योजनांची रचना करण्यात यावी व कालबाह्य योजना बंद कराव्यात यासाठी नियोजन ठरेल. जिल्हा नियोजन समितीचा निधी परत जाणे, निधीचे स्थायीकरण करण्यास प्रतिबंध व निधीचे वेळेत वितरण सुनिश्चित करण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार करण्यात येणार आहेत. नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या रचनेचा अभ्यास करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या अस्तित्वात असलेल्या संरचनेचा अभ्यास करून त्यामध्ये सुधारणा करून विविध कार्यालयांच्या कार्यपद्धतींचे परीक्षण करून पदांसाठी कार्यविभाजन व कार्यपद्धती नव्याने आखण्यात याव्यात अशी सूचना दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना आमच्यासाठी कानमंत्रचे काम करतात. जुलैच्या पहिल्या आठवड्यात यासंबंधी आणखी एक आढावा बैठक घेण्यात येणार असून १५ ऑगस्टनंतर नव्या कार्यपद्धतींची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होईल. महसूल व्यवहार सामान्य माणसाला सहज समजावेत यासाठी आणि विभागाला आधुनिक बनवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. सरकारी नोकरी म्हणजे अधिकार नव्हे, तर जनतेसाठी असलेले कर्तव्य आहे, हा भाव परिषदेतून निर्माण करण्याची संधी घेता आली. परिषदेची प्रामुख्याने फलश्रुती म्हणायची तर, राज्यातील अधिकाऱ्यांना एकत्र आणून त्यांच्यात विचारविनिमय घडविण्यात आला. अनुभवातून साकारलेल्या एकमेकांच्या चांगल्या व नावीन्यपूर्ण योजनांचे आदानप्रदान झाले. जलद, पारदर्शी कार्यपद्धती ठरविण्याचा प्रयत्न सुरू झाला. आता महाराष्ट्र थांबणार नाही.

**(पूर्व प्रसिद्धी दै. लोकसत्ता)**

# संघटन बांधणीला नवे बळ, 963 मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या पूर्ण

## प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संघटन विस्तारात ऐतिहासिक घोडदौड

**● २५८ नव्या मंडलांची स्थापना, ९६३ कार्यरत मंडलांतून पक्षशक्ती अधिक भक्कम ● स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीची मजबूत पायाभरणी**

**भारतीय** जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश संघटनेत एक महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. राज्यभरात एकूण १२२१ मंडल स्थापन करण्यात आले आहेत. त्यापैकी ९६३ मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण झाली आहे. संघटन हेच खरे बळ या तत्त्वावर चालत, भाजपाने आता महाराष्ट्रात मजबूत गड उभारण्याची तयारी सुरू केली आहे. भाजपाच्या संघटनात्मक बांधणीचा हा टप्पा महाराष्ट्राच्या सर्व भागांतील राजकीय ताकद दृढ करण्याच्या दृष्टीने निर्णायक ठरतोय. संपूर्ण राज्यभर १२२१ मंडल गठीत करण्यात आले आहेत, त्यापैकी ९६३ मंडलांची रचना जाहीर करण्यात आली असून, यातील २५८ मंडले नव्याने स्थापन केली गेली आहेत.


**प्रमुख विभागवार पाहता**
**कोकण-ठाणे विभागात १८४ मंडल**
**उत्तर महाराष्ट्रात १८४ मंडल**
**पश्चिम महाराष्ट्रात २२२ मंडल**
**विदर्भात ३१३ मंडल**
**मराठवाड्यात २०७ मंडल**
**मुंबई विभागात १११ मंडल**

मंडल गठीत करण्यात आले आहेत. या संपूर्ण नियुक्त्या केवळ आकडेवारी नाही, तर पक्षाची जनाधारावर आधारित शक्ती वाढवण्याचा प्रयत्न आहे. यातून भाजपच्या कार्यपद्धतीतील शिस्त, संघटन आणि वेळेचे भान प्रकर्षाने अधोरेखित होतं.

प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एका संघटित आणि समर्पित कार्यपद्धतीची ही सुरुवात आहे. भाजपाची रणनीती आता अधिक गावखेड्यांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सर्वसामान्य मतदाराशी थेट संवाद साधण्याचा ध्यास घेते आहे. संघटन पर्वाअंतर्गत भारतीय जनता पार्टीचे दीड कोटींहून अधिक प्राथमिक सदस्य आणि १ लाख ३४ हजारांहून अधिक सक्रीय सदस्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करून महाराष्ट्र भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान ऐतिहासिक ठरले आहे, अशा शब्दांत भाजपा राष्ट्रीय सरचिटणीस (मुख्यालय) खा.अरुण सिंह यांनी महाराष्ट्रातील भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संघटन पर्व यशस्वी ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पक्षाच्या ७० टक्के बूथ समित्यांचे गठन झाले असून २ एप्रिलपर्यंत १ लाखापर्यंत बूथ समित्या गठन करण्याचे उद्दिष्ट आहे. पक्षाच्या रचनेनुसार एका बूथमध्ये १२ सदस्य असतात म्हणजेच १२ लाख सक्रीय कार्यकर्त्यांची फौज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी कार्य करेल. संघटन सर्वोपरि या विचारधारेने कार्य करणाऱ्या भाजपामध्ये अंतर्गत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. ■

# अटलजींमधील सच्चा पत्रकार कायम राहिला

● डॉ.शिवशक्तीनाथ बक्शी



अटलबिहारी वाजपेयी हे व्यक्तिमत्व एका लेखाच्या शब्दमर्यादेत उभे करणे अत्यंत कठीण आहे. जनसंघ, भारतीय जनता पार्टी यांच्या उभारणीत अटलजींनी दिलेले योगदान आपणां सर्वांना ठाऊक आहे. पंतप्रधान म्हणून त्यांचे देशउभारणीतील योगदानही सर्वांना ठाऊक आहे.

**जनसंघ,** भाजपपासून पंतप्रधानपदापर्यंतच्या त्यांच्या प्रदीर्घ प्रवासात त्यांच्यातील पत्रकार मात्र कायम जीवंत राहिला. राजकीय नेता, कवी ही त्यांची दोन रूपे आपणां सर्वांना ठाऊक आहे. त्यांचे वक्तृत्व तर त्यांच्या विरोधकांचाही आदराचा विषय होता. मात्र त्यांच्या पत्रकारितेबद्दल सामान्य भारतीयांना, जनसंघ-भाजपा कार्यकर्त्यांनाही पुरेशी माहिती नाही. अटलजींनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा आरंभ पत्रकार म्हणूनच केला. प्रारंभीच्या काळात राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि दैनिक स्वदेश यांच्या संपादनाची जबाबदारी अटलजींनी पार पाडली. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी अटलजींना राष्ट्रधर्मच्या संपादकपदाची जबाबदारी स्वीकारण्यास सांगितले. लखनौ येथून या मासिकाचे प्रकाशन होत असे. 'राष्ट्रधर्म'ची वाचक संख्या वाढू लागली. राजकीय आणि सामाजिक वर्तुळात राष्ट्रधर्मची चर्चा होऊ लागली. राष्ट्रधर्मची लोकप्रियता वाढू लागल्यामुळे डाव्या विचाराच्या वर्तुळात अस्वस्थता निर्माण झाली. राष्ट्रधर्ममधील अटलजींच्या लेखनाची मोठी प्रशंसा होऊ लागली. बुद्धिमतांच्या वर्तुळात अटलजींचे नाव आदराने घेतले जाऊ लागले. हळूहळू हे राष्ट्रधर्म हे मासिक राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रिय मासिक बनले. याच दरम्यान पांचजन्य या नियतकालिकाचे प्रकाशन सुरू झाले. अटलजींना पांचजन्यच्या संपादनाची जबाबदारीही सोपविण्यात आली. महात्मा गांधींच्या हत्येनंतर शासनाने राष्ट्रधर्मच्या प्रकाशनावर बंदी घातली. राष्ट्रधर्मच्या अनेक कर्मचाऱ्यांना अटकही करण्यात आली. अटलजींनी स्वत:ला कसेबसे अटकेपासून वाचवले. न्यायालयाने बंदी उठवल्यामुळे राष्ट्रधर्मचे प्रकाशन पुन्हा सुरू झाले. राष्ट्रधर्मच्या कार्यालयातूनच दैनिक स्वदेशचे प्रकाशन होऊ लागले. मात्र प्रशासनाने पुन्हा राष्ट्रधर्मवर बंदी घालत कार्यालय सील केले. त्यावेळी अटलजी वाराणसी येथे गेले आणि त्यांनी तेथून चेतना या साप्ताहिकाचे प्रकाशन सुरू केले. १९५० मध्ये अटलजींवर स्वदेशच्या संपादनाची जबाबदारी पुन्हा सोपविण्यात आली. सरकारकडून होणारी कोंडी आणि आर्थिक स्थितीअभावी दैनिक स्वदेशचे प्रकाशन बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला. त्यावेळची राजकीय परिस्थिती पाहता या दैनिकाला सरकारी जाहिराती मिळत नव्हत्या. त्यामुळे अटलजींना दैनिक स्वदेशचे प्रकाशन थांबवण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. स्वदेशच्या अखेरच्या अग्रलेखामध्ये त्यांनी आपल्याला होणाऱ्या वेदना व्यक्त केल्या होत्या. त्यानंतर अटलजी लखनौवरून दिल्लीत आले. दिल्लीतील त्यांनी वीर अर्जुन या नियतकालिकाचे

संपादन केले. वीर अर्जुनची लोकप्रियता हळूहळू वाढू लागली. मात्र नियतीच्या मनात काही वेगळेच होते. त्यासुमारास म्हणजे १९५१ मध्ये जनसंघाची स्थापना झाली आणि अटलजींना जनसंघाच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली.



वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य आणि लोकशाही व्यवस्थेतील वृत्तपत्रांची भूमिका याचे अटलजींना नेमके भान होते. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर त्यांचा गाढा विश्वास होता. वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले तरच लोकशाही व्यवस्था आणखी मजबूत होईल, असे त्यांचे मत होते. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य ही आपल्या लोकशाहीची मोठी संपत्ती आहे, असेही अटलजी म्हणत असत. संपादकाने, पत्रकाराने आपण संपूर्ण समाजाला जबाबदार आहोत, हे कायम लक्षात ठेवले पाहिजे. संपादकाने आणि पत्रकाराने स्वत:च्या भूमिकेशी प्रामाणिक असले पाहिजे. संपादकाने आपल्या कर्तव्याशी प्रतारडना करू नये, असेही अटलजींचे सांगणे असे. सरकार आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील संबंध चांगले असावेत. सरकारने वृत्तपत्रांवर आणि अन्य प्रसारमाध्यमांवर कोणतीही बंधने घालू नयेत, असे अटलजींचे ठाम मत होते. पंतप्रधान झाल्यावर अटलजींनी संपादक आणि पत्रकारांना नेहमीच आदराची, सन्मानाची वागणूक दिली. नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्टच्या १२ जुलै १९९८ रोजी झालेल्या द्वैवार्षिक अधिवेशनात बोलताना त्यावेळी पंतप्रधानपद भूषविणाऱ्या अटलजींनी सांगितले होते की, देशातील प्रसारमांध्यमे आणखी सशक्त होण्याची गरज आहे. आपल्या देशातील वृत्तपत्रांनी, दूरचित्रवाणी वाहिन्यांनी आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांशी आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांशी स्पर्धा करावी. त्यासाठी आपल्या पत्रकारांनी, संपादकांनी गुणवत्ता वाढविण्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर बातम्या प्रसिद्ध करताना राष्ट्रहिताचे आणि समाजहिताचे भान ठेवले पाहिजे. पत्रकारांनी आणि संपादकांनी समाजाचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत, त्याचबरोबर समाजातील अनिष्ट प्रवृत्तींचा पर्दाफाश करण्यास पत्रकारांनी प्राधान्य द्यावे. देशातील नागरिकांनी देशाबद्दल कायम अभिमानच बाळगावा, या पद्धतीचे लेखन पत्रकारांनी करावे, त्याचबरोबर जगाचा आपल्या देशाबद्दल असलेला गैरसमज दूर करण्यासाठीही पत्रकारांनी, संपादकांनी आपल्या लेखणीद्वारे प्रयत्नशील असावे, अशा पद्धतीचे मार्गदर्शन अटलजींनी त्या भाषणात केले होते. जनसंघ, भाजप आणि नंतर देशाच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी या पद्धतीने राजकारणात सक्रिय असताना अटलजींनी आपल्या पत्रकारितेतील दिवसांची कायम आठवण ठेवली. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, मला चांगला पत्रकार बनायचे होते, मात्र राजकारणासारख्या कठीण खेळामध्ये मला उतरावे लागले. राजकारणामुळे

माझ्यातील पत्रकार आणि कवीची मुस्कटदाबी झाली.

पत्रकारांना व्यवहारात कोण-कोणत्या अडचणी येतात याची अटलजींना नेहमीच जाणीव असे. पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपाविषयीही त्यांना माहिती होती. 'कधी काळी पत्रकारितेकडे ध्येय म्हणून पाहिले जात असे. आता पत्रकाराची स्वरूप बदलून तो व्यवसाय झाला आहे. मी ज्यावेळी पत्रकार म्हणून काम सुरू केले त्याकाळात वृत्तपत्रात काम करणे हे अनेकांचे ध्येय असे. त्यावेळी देश पारतंत्र्यात होता. आपण स्वातंत्र्याची लढाई लढत होतो. देशातील प्रत्येक नागरिक स्वातंत्र्य लढाईमध्ये आपल्या परीने सहभागी होत होता. आता पत्रकारितेचा चेहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. पत्रकारितेला काळाच्या ओघात व्यवसायाचे स्वरूप आले आहे. कोणताही व्यवस्था वाईट नसतो. मात्र पत्रकारितेच्या व्यावसायाने फक्त पैसा कमविण्याच्या उद्देशाने काम करू नये. आपण ज्या बातम्या देतो, जे लेख लिहतो त्याचा समाज मनावर परिणाम झाला पाहिजे. २७ ऑगस्ट, १९९९ रोजी लखनौ येथे अटलजींच्या हस्ते पायोनियर या साप्ताहिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी केलेल्या भाषणात अटलजींनी पत्रकारांवरील जबाबदाऱ्यांविषयी भाष्य केले होते. त्या भाषणात अटलजी म्हणाले होते की, ज्या वृत्तपत्रांकडे संसाधनांची कमतरता असेल त्या वृत्तपत्रांनी वैचारिक आधारावर वाटचाल केली पाहिजे. समाजातील भ्रष्ट प्रवृत्ती, दुष्ट शक्ती यांच्यावर कठोर प्रहार करणे हे पत्रकारितेचे प्रमुख कर्तव्य असले पाहिजे. हे कामही पत्रकारांनी योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. वृत्तपत्रे प्रकाशित करणे हाही एक व्यवसाय आहे, हे जरी खरे असले तरी साबण आणि तेल विकण्यासारखा आपला व्यवसाय नाही, हे सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे. पत्रकारितेचे उद्दिष्ट कधीही विसरता कामा नये. पत्रकारांनी आपल्यावरील जबाबदाऱ्यांचे नेहमीच भान ठेवले पाहिजे. मी काही वर्षे पत्रकारिता केली असल्यामुळे वृत्तपत्र चालविताना कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याची मला पूर्ण कल्पना आहे. सध्याच्या काळात वृत्तपत्र व्यावसायातील स्पर्धा वाढली आहे. त्याचबरोबर वृत्तपत्रांना दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या स्पर्धेलाही तोंड द्यावे लागत आहे. दूरचित्रावाणी वाहिन्यांवर बातम्यांचा ओघ सतत चालू असतो. असे असले तरी वृत्तपत्रांचा खप अजूनही टिकून आहे. वृत्तपत्रातील बातम्यांबरोबर ते वृत्तपत्र कोणता विचार देते, हेही पाहणे महत्वाचे आहे.



अटलजींनी आणीबाणीमध्ये प्रसारमाध्यमांवर घातलेल्या निर्बंधांना कडाडून विरोध केला. अटलजींच्या प्रखर राष्ट्रवादाच्या विचारसरणीला लोकशाही व्यवस्थेविषयी असणाऱ्या नितांत आदाराची जोड मिळाली होती. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर सर्व सहमतीची भूमिका असावी, यासाठी अटलजी नेहमीच आग्रही असत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्यांवर सरकारची आणि विरोधी पक्षाची भूमिका निश्चित करताना दोघांनीही देशाच्या विविधतेच्या परंपरेची जाणीव ठेवलीच पाहिजे, असे अटलजींचे आग्रही मत होते. त्यांनी आपल्या संसदीय कारकीर्दीमध्ये विरोधी पक्ष नेत्याची भूमिका प्रदीर्घ काळ निभावली. कोणत्या मुद्यांवर सरकारला विरोध करायचा आणि कोणत्या मुद्यांवर सरकारच्या पाठीशी उभे राहायचे याविषयी भूमिका घेताना अटलजींनी नेहमीच राष्ट्रवादी विचाराला प्राधान्य दिले होते. सरकार विरोध करताना देशाचे हित धोक्यात येऊ नये, अशा मताचे अटलजी होते. अशा उदारमतवादी आणि व्यापक विचारांमुळे अटलजींचा प्रखर राष्ट्रवाद नेहमीच झळालता राहिला. शासक म्हणून कर्तव्य पार पाडत असताना त्यांच्यातील पत्रकार सदैव जागता असे. त्यांच्या भाषणामुळे श्रोते मंत्रमुग्ध होत असत. वक्तृवाप्रमाणेच त्यांची लेखणीही अत्यंत प्रभावी आणि धारदार होती. उत्तुंग उंचीचा नेता, संवदेनशील कवी याबरोबरच अटलजी हे प्रभावी पत्रकार होते. यामुळेच त्यांचे विचार अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरत आहेत. सक्रीय राजकारणातून दूर झाल्यानंतरही राजकारणातील त्यांचे अस्तित्व नेहमीच जाणवत असे. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाला माझे अभिवादन.

**(श्री.बक्शी हे भारतीय जनता पार्टीतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'कमल संदेश' या पाक्षिकाचे संपादक आहेत.)**

# शूर मराठा सरदार रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार मिळवण्यात राज्य सरकारला यश

> नागपूरकरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार रघुजी भोसले यांची लंडन येथे लिलावात निघालेली तलवार मिळवण्यात सरकारला मोठे यश आले आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. अशा प्रकारे लिलाव जिंकून आपली ऐतिहासिक वस्तू परदेशातून परत मिळवण्याची ही पहिलीच वेळ असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ॲड. आशिष शेलार यांनी आभार मानले आहेत.

**ऐतिहासिक** दस्तऐवज असलेली सदर तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त काल अचानक येऊन महाराष्ट्रात धडकले. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांना ही बातमी कळताच त्यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन सदर तलवार शासनाला मिळावी या दृष्टीने नियोजन करण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांना दूतावास संपर्क व या कामाची जबाबदारी देऊन स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ॲड. आशिष शेलार यांनी रात्री उशिरापर्यंत याबाबतचे नियोजन व संपर्क यंत्रणा उभी केली. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचने प्रमाणे ॲड. आशिष




शेलार यांनी तातडीने एक मध्यस्थ उभा करुन या लिलावात शासनाने सहभाग घेतला व लिलाव जिंकला. यासाठी हातळणी, वाहतूक व विमा खर्चासह सुमारे ४७.१५ लाख रुपये यासाठी खर्च अपेक्षित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकारच्या नावाने एक इतिहास नोंद होईल असा हा आनंदाचा क्षण आहे, अशी भावना यावेळी ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली.



# मराठा साम्राज्याचा ऐतिहासिक ठेवा महाराष्ट्रात येणार



नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची लंडनमध्ये लिलावात निघालेली ऐतिहासिक तलवार ही राज्य सरकारने खरेदी केली आहे, हे सांगताना मला आनंद होतो. त्यामुळे आपल्या मराठा साम्राज्यातील एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेवा आता महाराष्ट्रात येणार आहे. रघुजी भोसले हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार होते. त्यांची युद्धनीती आणि शौर्य यावर प्रसन्न होत छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी दिली होती. रघुजी भोसले यांनी १७४५ च्या दशकात बंगालच्या नवाबांविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्त्व करीत मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला होता. दक्षिण भारतात सुद्धा त्यांनी आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला होता. आपले सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव आणि माझ्याच कार्यालयात कार्यरत विकास खारगे यांनी वेगाने सूत्रे हलवून ही कामगिरी पूर्ण केली. काही तांत्रिक अडचणी होत्या, त्यामुळे एका मध्यस्थामार्फत ती खरेदी करण्यात आली. यासाठी ४७.१५ लाख रुपये राज्य सरकार देणार आहे. ही तलवार मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. एकधारी पाते, सोन्याचे नक्षीकाम हे त्या तलवारीचे वैशिष्ट्य आहे. युरोपिय बनावटीचे पाते हे त्या काळात प्रसिद्ध होते. या पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिले आहे. १८१७ मध्ये नागपुरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली होती. त्यात ही तलवार नेली असावी, असा जाणकरांचा अंदाज आहे.

■ देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

### तलवारीचे ऐतिहासिक महत्त्व

रघुजी भोसले प्रथम (१६९५ ते १४ फेब्रुवारी १७५५) हे नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार होते. रघुजी भोसले यांचे शौर्य आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होवून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही पदवी दिली होती. रघुजी भोसले प्रथम यांनी १७४५ आणि १७५५ मध्ये बंगालच्या नवाबाविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करून मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला. याचबरोबर रघुजींनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये चांदा, छत्तीसगढ, संबळपूर याही प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. दक्षिण भारतातील कुड्डाप्पाचा नवाब, कर्नूलचा नवाब यांचाही पराभव करून दक्षिण भारतात आपला लष्करी आणि राजकीय दबदबा निर्माण केला. अठराव्या शतकातील एक अत्यंत धाडसी मराठा सेनानी म्हणून रघुजी भोसलेंकडे बघितले जाते. नागपूर भोसलेंच्या भौगोलिक सीमांमध्ये लोखंड, तांबे यांच्या खाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या. यांचा



वापर वस्तूंसोबतच शस्त्रे बनवण्यासाठीही केला जात असे. नागपूरकर भोसले घराण्यातील राजशस्त्रे निर्मिती आणि सौंदर्य यांचा अजोड मिलाफ आहेत.

लंडन येथे लिलावात निघालेली रघुजी भोसले यांची तलवार ही मराठा शैलीच्या 'फिरंग' पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. सरळ, एकधारी पाते आणि सोन्याचे नक्षीकाम केलेली मुल्हेरी घाटाची मूठ ही तलवारीची वैशिष्ट्ये आहेत. तलवारीचे पाते हे युरोपीय बनावटीचे असून पात्याच्या खजान्याजवळ पाते बनवणाऱ्या कंपनीचे नाव आहे. युरोपीय बनावटीची पाती ही मध्ययुगीन भारतातल्या उच्च वर्गांमध्ये प्रसिद्ध होती. पात्याच्या पाठीवर



तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग' हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. पात्यावरील लेख ही तलवार रघुजी भोसले यांच्यासाठी बनवली गेली होती किंवा त्यांच्या वापरातील होती याकडे निर्देश करतो. तलवारीच्या मुल्हेरी मुठीवर सोन्याच्या पाण्याने कोफ्तगरी नक्षी काढलेली आहे. तलवारीच्या उभट मुसुमेला हिरव्या रंगाचे कापड गुंडाळलेले आहे.

रघुजी भोसले प्रथम यांची ही फिरंग तलवार अनेकार्थांनी महत्वपूर्ण आहे. बहुतांशी मध्ययुगीन मराठा शस्त्रांची कमी अथवा अजिबात नसलेले नक्षीकाम आणि शस्त्रांवरील निर्माणकर्त्याच्या किंवा वापरकर्त्याच्या नावाचा अभाव ही ठळक वैशिष्ट्ये होती. या दोन्हीसही अपवाद म्हणून रघुजी भोसले यांच्या तलवारीवर नावाचा लेख तसेच नक्षीकाम केलेले आहे. तलवारीचे युरोपीय बनावटीचे पाते अठराव्या शतकातील भारतातील आंतरराष्ट्रीय शस्त्रव्यापाराकडे निर्देश करते. नागपूरकर भोसलेंची १८१७ मध्ये सीताबर्डी येथे ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध लढाई झाली. या लढाईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाल्यावर कंपनीने नागपूरकर भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली. यामध्ये अनेक मौल्यवान वस्तू, दागिने तसेच शस्त्रांचाही समावेश होता. नागपूरचे संस्थान खालसा झाल्यावर ईस्ट इंडिया कंपनीला वेळोवेळी नजराणे आणि भेटीही मिळाल्या होत्या. रघुजी भोसलेंची तलवार युद्धानंतरच्या लुटीमध्ये अथवा ब्रिटिशांना दिलेल्या भेटींमध्ये देशाबाहेर गेली असण्याची शक्यता आहे, जाणकार व्यक्त करीत आहेत. ■

# शेकापचे माजी आमदार पंडित पाटील भाजपामध्ये



**शेकापचे माजी आमदार पंडित (सुभाष) पाटील भाजपामध्ये- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, खा. धैर्यशील पाटील, आ. महेश बालदी, आ. प्रशांत ठाकूर, अविनाश कोळी, कमलाकर दळवी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन. यावेळी जि.प. माजी अध्यक्ष आस्वाद पाटील, माजी सभापती चित्रा पाटील, सवाई पाटील, जनार्दन पाटील, सुगंधा पाटील, संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, भावना पाटील, संदीप घरत, एकनाथ गायकवाड, वैभव चांदे, वसंत यादव, राजा सानप, स्मिता पाटील, महादेव दिवेकर आदींनीही भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.**

# 'बनवाबनवी'चा हेराल्ड प्रयोग

● केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते

> नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राच्या मालमत्ता व्यवहार प्रकरणी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर अंमलबजावणी संचालनालयाने नुकतेच दोषारोप पत्र दाखल केले आहे. यावरून काँग्रेसने आंदोलनाची नौटंकी केली. काँग्रेस नेत्यांकडून सूडबुद्धी वगैरे भाषेत गळेही काढले गेले. सामान्य माणसाला सोडाच, परंतु काँग्रेसच्या अनेक पदाधिकारी, नेत्यांनाही नॅशनल हेराल्डचा व्यवहार, त्यात झालेली बनवाबनवी, या व्यवहारातील कायदेशीर गुंतागुंत याची माहिती नाही. त्यासाठी नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राच्या स्थापनेपासूनचा इतिहास माहिती करून घेणे आवश्यक आहे.

**ब्रिटिशांविरोधात** लढणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांचा आवाज म्हणून १९३७ मध्ये जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्य संग्रामात लढत असलेल्या ५ हजार कार्यकर्त्यांकडून भाग भांडवल गोळा करत हे वृत्तपत्र सुरू केले. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीकडून या वृत्तपत्राचे प्रकाशन होत होते. या कंपनीवर कोणा एका व्यक्तीची मालकी नव्हती. कौमी आवाज हे उर्दू आणि नवजीवन हे हिंदी वृत्तपत्रही असोसिएडेट जर्नल्स लिमिटेडकडून प्रकाशित केले जात असे. ब्रिटिशांविरोधात आवाज उठवण्यासाठी नॅशनल हेराल्डने मोलाचे काम केले.स्वातंत्र्य संग्रामात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांचा आवाज सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्याचे काम या वृत्तपत्राने केले. वेगवेगळ्या




विषयाबाबत काँग्रेसची भूमिका, ध्येय-धोरणे याच वृत्तपत्रातून जनतेपर्यंत पोहचवली जात असत. खुद्द जवाहरलाल नेहरू नॅशनल हेराल्डचे संपादकीय लिहित असत. ब्रिटिशांवर सातत्याने टीका होत असल्याने इंग्रज सरकारने १९४२ मध्ये या वृत्तपत्रावर बंदी आणली. १९४५ मध्ये ही बंदी उठवली गेली. १९४७ मध्ये पंडित नेहरू पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी असोसिएटेड जर्नल्सच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेसचे मुखपत्र अशीच नॅशनल हेराल्डची ओळख बनली. एम.चलपती राव यांनी संपादक असताना नॅशनल हेराल्ड, नवजीवन आणि कौमी आवाज या तिन्ही वृत्तपत्रांचा संपादकीय दर्जा चांगला ठेवला. काँग्रेसचे मुखपत्र असले तरी ही तिन्ही वृत्तपत्रे राजकीय आणि प्रसारमाध्यमांच्या वर्तुळात चर्चेचा विषय बनली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केंद्रात आणि बहुतांश राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार होते. त्यामुळे या वृत्तपत्रांवर सातत्याने सरकारी मेहरनजर होत होती. दिल्लीत नॅशनल हेराल्डला आवृत्ती काढण्यासाठी सवलतीच्या दरात मोठी जागा मिळाली. अनेक राज्यांनी या वृत्तपत्रासाठी १ रुपया, दोन रुपये प्रति चौरस मीटर एवढ्या अल्पदराने जागा दिल्या होत्या. दिल्लीबरोबरच मुंबई आणि लखनौ येथेही या वृत्तपत्रासाठी जागा देण्यात आली. देशभरात १०० ठिकाणी नॅशनल हेराल्डसाठी जागा देण्यात आल्या. हळूहळू असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची स्थावर मालमत्ता वाढत गेली.

कालांतराने या वृत्तपत्रांच्या आर्थिक व्यवस्थापनाचे गणित बिघडत गेले. २००८ मध्ये हे दैनिक कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला. तोपर्यंत



काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीला ९०.२५ कोटी रूपये एवढे कर्ज बिनव्याजी दिले होते. एखाद्या राजकीय पक्षाला, खासगी कंपनीला बिनव्याजी कर्ज देता येते का, हा यातला मुख्य मुद्दा आहे. २००८ मध्ये असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीच्या ताब्यात २ हजार कोटी रूपये इतक्या बाजारमूल्याची मालमत्ता होती. येथपर्यंत काँग्रेस आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड यांच्यातच आर्थिक व्यवहार होत होते. नेहरू-गांधी कुटुंबियांचा तोपर्यंत या कंपनीच्या आर्थिक व्यवहाराशी कसलाच संबंध नव्हता.


२०१० मध्ये यंग इंडियन लिमिटेड नावाच्या कंपनीची स्थापना झाली आणि गांधी कुटुंबियांचा या नाट्याच्या रंगमंचावर प्रवेश झाला. यंग इंडियन या कंपनीचे भाग-भांडवल होते अवघे ५ लाख रुपयांचे. त्यात सोनिया आणि राहुल गांधी यांचा प्रत्येकी ३८ टक्के म्हणजे एकूण ७६ टक्के वाटा होता. देशातील तरुणांमध्ये सर्वधर्म समभावाचा प्रसार करण्याच्या उदात्त उद्दिष्टासाठी यंग इंडियनची स्थापना झाल्याचे सांगण्यात येत होते. आपल्या उद्दिष्ट प्राप्तीच्या दिशेने या कंपनीने किती मजल मारली, याची माहिती कुठूनही उपलब्ध होत नाही. असो. मुद्दा होता तो यंग इंडियन आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड यांच्यातील आर्थिक व्यवहाराचा.डिसेंबर २०१० मध्ये काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीला असे कळवले की, ९०.२५ कोटी येणे रकमेपैकी आम्हाला फक्त ५० लाख रूपये द्या आणि उरलेले ८९.७५ कोटी रूपये यंग इंडियन ला द्या. याचा अर्थ काँग्रेसने आपले ८९.७५ कोटी रूपयांचे येणे स्वत:च बुडवून टाकले. ही रक्कम गांधी कुटुंबियांच्या म्हणजेच यंग इंडियन कंपनीच्या नावे झाली.

बनवाबनवीचे खरे नाटक यानंतर सुरू झाले. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड या कंपनीने आपल्या हिशोबाच्या वहीत ८९.७५. कोटी रूपयांच्या कर्जाचे रूपांतर शेअर्समध्ये केले. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या एकूण भागभांडवलाच्या ९९ टक्के इतकी रक्कम या शेअर्समध्ये होती. याचा परिणाम असा झाला की असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडचा संपूर्ण ताबा यंग इंडियन कंपनीकडे गेला. यंग इंडियन ही कंपनी असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या २ हजार कोटी रूपयांच्या मालमत्तेची मालक झाली. आता या मालमत्तेची किंमत ५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जाते. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची प्रचंड मालमत्ता सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या ताब्यात देण्यासाठी रचलेला हा कॉर्पोरेट कट होता.

काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला दिलेले ९० कोटी रूपयांचे कर्ज फक्त ५० लाख रूपये देऊन निर्लेखित (राइट ऑफ) करण्यात आले. म्हणजे फक्त ५० लाख रूपये किमतीत ५ हजार कोटींची मालमत्ता गांधी कुटुंबियांच्या नावाने झाली. नॅशनल हेराल्डला तोटा होत आहे म्हणून काँग्रेसने ९० कोटींचे कर्ज बिनव्याजी हे वृत्तपत्र चालवणाऱ्या असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला दिले होते. यात कागदोपत्री गांधी कुटुंबियांचा कुठेही संबंध नव्हता. या वृत्तपत्राची मालकी यंग इंडियनकडे हस्तांतरीत झाल्यानंतर २९ कोटींची रक्कम जाहिरातीच्या रूपाने मिळाली असल्याचे हिशोबात दाखवण्यात आले होते. या व्यवहारात नॅशनल हेराल्डसाठी भागभांडवल देणाऱ्या ५ हजार स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसदारांचे कोठेही नाव नव्हते. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची मालकी यंग इंडियनकडे देताना मूळ भागधारकांची संमती घेणे आवश्यक होते. मात्र तशी संमती घेतली गेली नव्हती. यंग इंडियनला १८ कोटी रूपयांच्या देणगीचा उल्लेख या कंपनीच्या हिशोबात सापडतो. मात्र या कंपनीने आपल्या उद्दिष्टाप्रमाणे एक पैसाही सामाजिक कार्यासाठी खर्च केल्याचे दिसत नाही. बनवाबनवीचा हा प्रयोग उघड झाल्यानंतर गांधी कुटुंबीय आणि या कुटुंबियांचे चेलेचपाटे छाती पिटून कांगावा करू लागले आहेत. आरोपपत्रात उल्लेख केलेल्या एकाही मुद्यावर गांधी कुटुंबियांना किंवा काँग्रेसच्या एकाही नेत्याला समाधानकारक उत्तर देता आले नाही. न्यायालयात सुनावणीदरम्यान या बनवाबनवीचे पितळ उघडे पडेल तेव्हा गांधी कुटुंबीय काय उत्तर देणार याची प्रतिक्षा आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# इतिहासात पहिल्यांदाच खादी आणि ग्रामोद्योगांची उलाढाल 1 लाख 70 हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त




**देशात** स्वावलंबनाची भावना निर्माण करणाऱ्या खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्राने गेल्या ११ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गतिमान नेतृत्वाखाली तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली केवळ नवीन उंची गाठली नाही तर कोट्यवधी ग्रामस्थांच्या जीवनात आशेचा प्रकाशही आणला आहे. खादी आता केवळ एक कापडाचा प्रकार राहिलेली नाही, तर 'एक भारत, श्रेष्ठ भारत'च्या निर्मितीचे प्रतीक बनली आहे, असे खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे (खादी आणि ग्रामोद्योग आयोग) अध्यक्ष मनोज कुमार म्हणाले. केव्हीआयसीने २०२४-२५ या आर्थिक वर्षात उत्पादन, विक्री आणि नवीन रोजगार निर्मितीत एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे, अशी माहिती मनोज कुमार यांनी दिली. गेल्या ११ वर्षांत विक्रीत ४४७ टक्के, उत्पादनात ३४७ टक्के आणि रोजगार निर्मितीत ४९.२३ टक्के वाढ झाली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे २०२३-२४ या आर्थिक वर्षात २०१३-१४ च्या तुलनेत विक्रीत ३९९.६९% आणि उत्पादनात ३१४.७९% वाढ झाली आहे. खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष म्हणाले की, २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांचे उत्पादन २६१०९.०७ कोटी रुपये होते, परंतु ते जवळजवळ चार पटीने म्हणजे सुमारे ३४७% ने वाढ नोंदवत २०२४-२५ या आर्थिक वर्षात ११६५९९.७५ कोटी रुपयांवर पोहोचले. २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३११५४.१९ कोटी रुपये असलेली विक्री २०२४-२५ या आर्थिक वर्षात जवळजवळ पाच पटीने वाढून १७०५५१.३७ कोटी रुपयांवर पोहोचली, जी आतापर्यंतची सर्वाधिक विक्री आहे.

गेल्या ११ वर्षांत खादीच्या कपड्यांच्या उत्पादनातही अभूतपूर्व वाढ दिसून आली आहे, असे माध्यमांशी बोलताना मनोज कुमार यांनी सांगितले. २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी कपड्यांचे उत्पादन ८११.०८ कोटी रुपये होते, तर २०२४-२५ या आर्थिक वर्षात ते ३६६ टक्क्यांनी म्हणजे साडेचार पटीने वाढून ३७८३.३६ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. खादी कपड्यांच्या विक्रीतही प्रचंड वाढ झाली आहे. २०१३-१४ या आर्थिक वर्षात खादी कपड्यांची विक्री केवळ १०८१.०४ कोटी रुपये होती, परंतु २०२४-२५ या आर्थिक वर्षात ती सुमारे साडेसहा पटीने वाढून ७१४५.६१ कोटी रुपये झाली, ज्यामध्ये ५६१ टक्के वाढ झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या व्यासपीठावरून खादीच्या कपड्यांच्या केलेल्या जाहिरातीचा खादी कपड्यांच्या विक्रीवर मोठा परिणाम झाला आहे, याचा त्यांनी पुनरुच्चार केला. ■

# पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्वाचे पाऊल




**महाराष्ट्र** शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई–रिक्षा योजनेच्यामाध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई–रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई–रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई–रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई–रिक्षा या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई–रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात २ हजार महिलांना या योजनेअंतर्गत ई–रिक्षा वितरीत होवून रोजगार उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई–रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. ■

# सायबर गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी 50 सायबर पोलीस ठाणे



**सायबर** फसवणुकीच्या प्रकरणांचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी राज्य शासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत. सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्यशासन विविध पातळ्यांवर काम करीत आहे. त्यानुसार राज्यामध्ये ५० सायबर पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली असून जिल्हा आयुक्त स्तरावर सायबर लॅबची स्थापना करण्यात येत आहे. कार्यान्वीत झालेल्या लॅबमध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच जागतिक स्तरावरील अत्याधुनिक आणि क्रांतिकारी उपक्रम महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र सायबर कार्यालयातील एनसीआरओ पोर्टल व सायबर हेल्पलाईन १९३० वर एकूण ३ लाख ३२ हजार ५३८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सायबर गुन्ह्यांतील फसवणुकीच्या रक्कमेपैकी ४४०.३७ कोटी रूपये वाचविण्यात आले आहेत. संगणक,लॅपटॉप,मोबाईल यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार ऑनलाईन होऊ लागल्याने शासनाने नागरिकांची होणारी फसवणूक थांबविण्याच्या दृष्टीने http://cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आणि टोल फ्री क्रमांक १९३० वर आर्थिक फसवणूक झाल्याबाबत तात्काळ तक्रार नोंदविण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे.

नॅशनल क्राईम रिर्पोटींग पोर्टलवर सन २०२४ मध्ये ऑनलाईन आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणात मुंबई शहरात २ पुणे शहरात १२५ व ठाणे शहरात ८६२ सायबर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तर आर्थिक फसवणूक झालेल्या सायबर गुन्ह्यांमध्ये ८३८ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे व ९४२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण राज्यात एकंदरीत सायबर गुन्ह्यांमध्ये १ गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून त्यामध्ये १ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सायबर गुन्ह्यांवर वचक निर्माण करण्यासाठी नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत आहेत. कमांड अँड कंट्रोल सेंटर अंतर्गत हेल्पलाईन १९३० आणि राज्यासाठी १९४५ हेल्पलाईन क्रमांकाद्वारे सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदणी आणि त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यात येत आहे. सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून पुढील पाच वर्षात ५ हजार पोलीसांना सायबर तपास आणि प्रतिबंधात्मक उपायांसाठी प्रशिक्षित करण्यात येणार आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक महाराष्ट्र सायबर यांनी कळविले आहे. ■

# नियमांचे उल्लंघन केल्यास वाळू डेपो रद्द!

## अनियमितता लक्षात आल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा इशारा

**राज्यातील** वाळू डेपोंमधील अनियमितता, गैरव्यवहार आणि नियमांचे उल्लंघन होत असल्याचे लक्षात आल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कठोर पवित्रा घेतला असून, राज्यातील सर्व ५७ वाळू डेपोंना नोटीस बजावण्यात आली आहे. विभागीय आयुक्तांमार्फत राज्यातील डेपोंचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल तीन दिवसांत मागितला असून, नियमांचे पालन न करणारे डेपो रद्द करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यासोबतच, नदीच्या वाळूवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कृत्रिम वाळू (एम सँड) धोरण लवकरच मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

### डेपो कार्यपद्धतीचा तीन दिवसात अहवाल

वाळू डेपोंमधील गैरप्रकार आणि जनतेच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वाळू वाहतुकीसंदर्भातील नियमांचे पालन न करणे, सीसीटीव्ही यंत्रणेचा अभाव, आणि डेपोमधून प्राप्त होणाऱ्या रेतीमध्ये होणारी टाळाटाळ यांसारख्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, सर्व डेपोंच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांना तीन दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. निकषांनुसार काम न करणारे डेपो रद्द करण्यात येतील. वाळूसंदर्भात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष डेपो तपासणी करून जिल्हाधिकाऱ्यांकडे तीन दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. विशेषतः नागपूरमधील १० डेपोंना नियमांचे उल्लंघन केल्याने तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. या डेपोना सात दिवसांत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले असून, अन्यथा कायम स्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला जाईल, असेही मंत्री बावनकुळे म्हणाले.

### पुढच्या मंत्रिमंडळात कृत्रिम वाळूचा प्रस्ताव

राज्य सरकारने नुकतेच रेती निर्गती धोरण लागू केले आहे, ज्यामुळे वाळूच्या व्यवहारांवर कडक नियंत्रण ठेवण्यात येत आहे. याच धोरणाचा भाग म्हणून आता कृत्रिम वाळूसाठी (एम सँड) स्वतंत्र धोरण आणण्याची तयारी सुरू आहे. येत्या मंत्रिमंडळ बैठकीत या धोरणाला मंजुरीसाठी सादर केले जाईल. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर उभारून एम सँड तयार केले जाईल. यामुळे नदीच्या वाळूची गरज कमी होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल. या धोरणामुळे बांधकाम क्षेत्राला परवडणाऱ्या दरात वाळू उपलब्ध होईल आणि अवैध वाळू उत्खननाला आळा बसेल, अशी अपेक्षा आहे. ■




**येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत कृत्रिम वाळू तयार करण्यासाठी एम सँड धोरण आणण्यात येणार आहे. आम्ही प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर आणत आहोत ज्याने एम सँड तयार होईल. यामुळे नदीच्या वाळूची गरज राहणार नाही.**

**– चंद्रशेखर बावनकुळे**
**प्रदेश अध्यक्ष व महसूलमंत्री**




पश्चिम बंगालमधील हिंदू नरसंहारा विरोधात भारतीय जनता पार्टीच्या बंगाली प्रकोष्ठच्या वतीने प्रदेश कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन– उपस्थिती– मुंबई भाजपा अध्यक्ष व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, प्रकोष्ठचे प्रभारी व माजी मंत्री विजय तथा भाई गिरकर, बंगाली प्रकोष्ठचे संयोजक रंजन चौधरी, सुभागत दास, सरचिटणीस निरंजन बोस, मिरा रोडच्या प्रकोष्ठच्या महिला अध्यक्ष मंजुला बसक, रहिम दत्ता आदी.

अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने प्रदेश कार्यालयात जम्मू–काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने– उपस्थिती– मुंबई अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष वासिम खान, उपाध्यक्ष सलमान खान, मासुक सिद्दीकी, हुसेन खान, अलताफ शेख, आदिल शेख, जहांगीर खान आदी.







मुंबई– दहशतवाद्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या निरपराध भारतीयांना श्रद्धांजली– उपस्थिती– एस एम खान, एम.ए. काश्मीरी, इस्माइल शेख, इकबाल दलखानिया, हनीफ कुरेशी, जयनुतुन्निसा आपा, निशा खान, महेंद्र गोसाई, राज यादव, विजय पाठक, उर्मिला रवी गुप्ता, सुनील दुबे, रवी गुप्ता, आर.के. दुबे, राजेश चौहान, पंकज शर्मा, महेश चव्हाण, विश्वास गजघाटे, अमरचंद यादव, रामाश्रय यादव, भिषम यादव आदी.




पुणे– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, विभागीय संघटन मंत्री मकरंद देशपांडे, आ. हेमंत रासने, आ. शंकर जगताप, आ. राहुल कुल, आ. भीमराव तापकीर, आ. महेश लांडगे, आ. योगेश टिळेकर, आ. अमित गोरखे, आ. उमा खापरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक–निंबाळकर, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, पुणे अध्यक्ष धीरज घाटे आदी.




पश्चिम विदर्भ विभागीय आढावा बैठक– उपस्थिती– प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, विदर्भ विभाग संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर, माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर आदी.

कोल्हापूर– उपस्थिती– खा. धनंजय महाडिक, युवा मोर्चा अध्यक्ष आणि जिल्हा संयोजक अक्षय पाटील, शिवाजी बुवा, विकास पाटील, विक्रम पाटील, भिकाजी जाधव, उत्तम गाडवे, मारुती बुवा, हणमंत पाटील, जयसिंग पाटील, बाबासो चव्हाण आदी.





अकोला जिल्ह्यातील गोंधळवाडी या आदिवासी बहुल गावातील नागरिकांच्या समस्या जाणून घेताना प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण. उपस्थिती- प्रदेश सरचिटणीस आ.रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, सरपंच यशोदा भोकरे, गजानन भोकरे, जयवंत म्हसाळे, प्रमोद खिल्लारे आदी.




जळगाव, धुळे, नंदुरबार व मालेगाव- उपस्थिती- प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, पणन मंत्री जयकुमार रावल, खा. स्मिता वाघ, ज्येष्ठ नेते व माजी मंत्री विजयकुमार गावित, माजी केंद्रीय मंत्री सुभाष भामरे, आ. अनुप अग्रवाल, आ. काशीराम पावरा, आ. सुरेश भोळे, आ.अमोल जावळे, राजेश पाडवी आदी.

सातारा- उपस्थिती- प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, महेश जाधव, स्वप्निल ढवळे, दिगंबर सुर्यवंशी, योगीराज सरकाळे, शंकरराव शेजवळ, विलास आटोळे, विक्रम विजापुरे, विक्रम माने, दत्ता फुके, प्रजोत कदम, विक्रम जोशी, सिद्धेश ढवळे, राकेश थोरात आदी.






सिंधुदुर्ग- उपस्थिती- शक्तिकेंद्र प्रमुख हर्षद साळगांवकर, बुथप्रमुख अनंत केळजी, शेखर येरागी, सुनील भोगवेकर, गणपत कांबळी, मंदार माडये, पुरुषोत्तम कांबळी, मिथुन कांबळी, विजया कांबळी, लक्ष्मी भोगवेकर, मनाली कांबळी, विद्या कांबळी, रेक्ष्मा कांबळी, शुभांगी भोगवेकर, सुजाता कांबळी, अगोस्तीन रॉड्रीक्स, ममता कांबळी, सुषमा कांबळी, सरीता कांबळी, रमेश खोबरेकर, हेमंत येरागी, शशी पेडणेकर, विजय म्हाकले, संजय येरागी, रंजना गिरप, शेखर खोबरेकर, राखी येरागी, कामिनी खोबरेकर, विजया म्हाकले आदी.



जालना- उपस्थिती- डॉ. स्वप्नील मंत्री, डॉ. सुधीर आंबेकर, मुकुंद मातने, तुकाराम पवार, मधुकर काळदाते, राम सुपेकर, परमेश्वर कदम, दिगंबर मुळे, दीपक घुले, रतन घुले, ज्ञानदेव घुले, संदीप घुले, सोपान घुले, विष्णू काळदाते, ज्ञानेश्वर साळुंखे, उद्धव काळदाते, विष्णू धुमाळ, दत्ता जाधव, प्रल्हाद माने, मारोती जाधव, विष्णू जाधव, मंगेश माने, कार्तिक धुमाळ, रत्नाकर जोशी, कैलास मातने, निळकंठ कदम, कैलास शिंगटे, डॉ. हरिप्रसाद ढेरे, अमोल अग्रवाल, आनंद कोटेचा आदी.




सोलापूर (प्रभाग क्रमांक १०)- गाव वस्ती संपर्क अभियानांतर्गत ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार- उपस्थिती- ज्येष्ठ कार्यकर्ते व्यंकटेश सारंगी, अरविंद बदलापुरे, तुकाराम भंडारी, यशवंत साका, तुळशीदास यल्ला, सिद्धार्थ मंजेली, काशिनाथ सामल, विजय इप्पाकायल, भास्कर मरगल, नारायण ताटीपामुल, राजु पानगंटी, पांडुरंग बोल्लु, नामदेव इराबत्ती, श्रीनिवास आडम, नंदू कुटला, अंबादास सामल, लक्ष्मण मुनगपल्ली, जयराम रापेल्ली आदी.




कॉंग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खा. धनंजय महाडिक, आ. सदाभाऊ खोत, आ. राहुल कुल, आ. योगेश टिळेकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.




नागपूर– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर येथे चेतना जागृती फाउंडेशनच्या चेतना जाधव, ब्राह्मण समाज संघटन छत्रपती संभाजी नगर येथील कपिल कुलकर्णी, मोमीन पुरा येथील अब्दुल शहराज, राजपूत समाज संघ पिंपरी चिंचवडचे हेमंत राजपूत, ब्राह्मण समाज संघटन नागपूरचे दीपक दुबे यांच्यासह अनेक समर्थकांनी भाजपात प्रवेश.



कोराडी (जि.नागपूर)– हिंगणा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या उज्वला बोढारे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे १६ सरपंच, पंचायत समितीचे ३ सदस्य, एक माजी सभापती, ५ नगरसेवक, सहकारी संचालक मंडळाचे एकूण १५ संचालक, सर्व पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




**प्रति,**

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,

महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,

वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०

दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५

ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com